वर्ष : सतरावे
मे २०२५
अंक : पाचवा
मूल्य १० रुपये
पृष्ठसंख्या ५६

# राजहंस ग्रंथवेध

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी
'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

माणिक वर्मा आणि त्यांचे कुटुंब म्हणजे विविध कलाक्षेत्रामध्ये
रसिकांच्या मनात अढळ स्थान मिळवलेली अनमोल रत्ने.
संगीतक्षेत्रात आपल्या स्वर्गीय सुरांनी वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केलेल्या
माणिक वर्मा यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त या समग्र परिवाराच्या कलाकर्तृत्वाचा
वेधक, वेचक शब्दपट म्हणजे हे पुस्तक.



हे आहे एका संवेदनशील लेखिकेच्या मनाचे स्वतःच्या शोधाचे मर्मस्पर्शी लेखन...
शब्दाशब्दांतून व्यक्त होणारी तिची जीवन समजून घेण्याची असोशी...
तिच्या स्वतःच्या आतला प्रामाणिक आणि उत्कट आवाज ऐकून
आपल्यालाही जगण्याचं भान येईल.
तेव्हा संग्रही हवंच असं हे पुस्तक....



ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी 'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

*आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू ॥*
*शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोकां ॥*

**संत तुकाराम**

# राजहंस ग्रंथवेध

संपादक :
डॉ. सदानंद बोरसे

सल्लागार संपादक :
विनया खडपेकर

कार्यकारी संपादक :
डॉ. प्रिया निघोजकर

संपादन साहाय्य :
विनायक पणशीकर
नरेश सबजीवाले
शुभांगी देशपांडे
डॉ. उमेश करंबेळकर
पंकज क्षेमकल्याणी
आरती घारे

मुखपृष्ठ शीर्षकरचना :
बाबू उडुपी

बोधचित्रे :
राहुल देशपांडे

मुखपृष्ठ :
तृप्ती देशपांडे

अक्षरजुळणी :
यशोधन लोवलेकर

वर्ष सतरावे :
अंक पाचवा
१५ मे २०२५
मूल्य : ₹ १०/-

अनुक्रम :


- संपादकीय / ५
- राजहंसी ग्रंथसृष्टी
  - *रोहिणी निरंजनी* - अतुल पेठे / ९
- गाऊ त्यांना आरती - *महर्षी ते गौरी* / १५
- अभिजात मराठीची अक्षरप्रभा / १९
- असे जन्मले पुस्तक!
  *मिरॅकल* - डॉ. सुनील विभुते / २५
- आठवणींचा पारिजात
  - *प्रॉम्प्टर* - माधव वझे / २९
- क... कवितेचा
  - मृणालिनी कानिटकर जोशी / ३३
- उद्‍गार -
  *सायबर अ‍ॅटॅक*
  - डॉ. चंद्रशेखर फणसळकर / ३५
- श्रद्धांजली - अशोक प्रभाकर डांगे
  - अनिल किणीकर, दिलीप माजगावकर / ३७
- राजहंसी पार / ४५
- वाचकांच्या मनातलं... / ४९


या अंकातील लेखांमधील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

पत्रव्यवहाराचा पत्ता : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. फोन - (०२०) २४४७३४५९
संपादक विभाग - ७४९८७११९३०.
E-mail : rajhansgranthvedh@gmail. com ● Website : www. rajhansprakashan. com

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली ‘राजहंसी’ पुस्तके




मृत्यू समीप असतानाही जगावेगळा विचार करणाऱ्या व्यक्तींच्या या आहेत असामान्य जीवनस्पर्शी आणि वास्तवदर्शी कथा... यांतील प्रसंग, गूढता, ताणतणाव आणि दिलासा देणारा हळुवार स्पर्श वाचकांना मनभावन होईल.

### सोबत सांजवेळची

डॉ. प्रियदर्शिनी कुलकर्णी । अनु. : पद्मजा मेहेंदळे

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)

हे पुस्तक आहे... सुमारे साडेचार अब्ज वर्षांपूर्वी निर्माण झालेल्या पृथ्वीच्या अंतरंगाविषयीचं! तिच्या आजतागायत सुरू असलेल्या बदलांच्या आणि त्याला कारणीभूत असलेल्या घटकांच्या रंजक आणि सुबोध पद्धतीनं केलेल्या शास्त्रीय मांडणीचं...! तेव्हा जरूर वाचा...

### शोध बदलत्या पृथ्वीचा

सतत बदलत्या भूगर्भीय घडामोडींचा वेध

सुनीत पोतनीस

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)







ही आहेत कवीची स्वगतं! या आहेत जगण्यातल्या विरामचिन्हांच्या काव्यात्म नोंदी अन् आटलेल्या मायेच्या स्मृती. जगण्यातील शुष्कतेला ओल देणारा हा प्रार्थनाशील सूर... हृदयातून ऐकावा असा...

### छतं गळोत

श्रीधर देशपांडे

किंमत : ₹ १६०/- । (ट.ख. ₹ ५०)

# संपादकीय

*मे महिन्यात गुरूदेव रवीन्द्रनाथ टागोर यांची जयंती असते आणि मातृदिनही असतो. या दिनविशेषांच्या निमित्तानं रवीन्द्रनाथांचे कालातीत अन् द्रष्टे विचार आपल्यासमोर मांडले आहेत...*

नमस्कार वाचकहो,

ऋतुराजाच्या दरबारात सध्या वैशाखवणवा उच्च स्थानी विराजमान झालाय. त्याच्यापुढे नतमस्तक होण्याशिवाय आपल्याकडे दुसरा पर्याय तरी आहे का! मुक्त आकाशीच्या छताखाली शीतलतेच्या निवाऱ्याला जावं म्हटलं तर भवताल असुरक्षेच्या भयानं व्यापलेला. मग अशा वेळी आपल्या ठायीच आपण काही सत्त्वशील अनुभवू शकतो का, चिंतनात उतरवू शकतो का असं मनात आलं आणि एक चिंतन आपल्यासमोर ठेवावंसं वाटलं.

या विचारामागे आणखीही एक कारण आहे. ते म्हणजे या महिन्यात गुरूदेव रवीन्द्रनाथ टागोर यांची जयंती असते आणि मातृदिनही असतो. या दिनविशेषांच्या निमित्तानं रवीन्द्रनाथांच्या कालातीत अन् द्रष्ट्या विचारांची उजळणी करावी, बाहेरच्या सर्वार्थानं तप्त वातावरणातही आपल्या आत्मारामाला गुरूदेवांच्या प्रांजळ, शाश्वत अशा काही मूल्यधारांनी स्नान घडावं असं वाटलं. गुरूदेवांचे शब्द म्हणजे आल्हाददायक झुळूक आहे. लहान मुलांना अक्षरओळख करून देणाऱ्या 'सहज पाठ' सारख्या पुस्तकांपासून ते तत्त्वज्ञानविषयक ग्रंथापर्यंत सर्व प्रकारचे लेखन त्यांनी केलंय. आता उन्हाळी सुट्ट्याही सुरू झाल्यायत. लहानग्यांना तर या सुट्टीची मौज वाटतेच ; पण आपण मोठी मंडळीही त्यांच्यासमवेत लहान होऊन जातो. अशा वेळी गुरूदेवांचं बालकाव्य मनाला मोहवतं...

*संध्याकाळ झाल्यावर दिवा लावून*
*तू जेव्हा गायींच्या गोठ्याकडे जाशील,*
*तेव्हा आई, मी फुलांच्या फांद्यांशी खेळून*
*टुपकन् भुईवर उडी मारीन.*
*मी परत तुझे मूल होईन आणि तुला म्हणेन, 'गोष्ट सांग.'*

*तू विचारशील, 'कुठे रे होतास खट्याळा!'*
*मी म्हणेन, 'आम्ही नाही सांगणार जा!'*

चाफ्याचं फूल होऊन आईसोबत 'लपंडाव' खेळण्याचा मायलेकराच्या नात्यातील हा किती सुंदर, निरागस काव्यानुभव आहे! गुरूदेवांच्या निरागस भावच्छटेचा हा केवळ एक नमुना!

केवळ बंगालीच नव्हे तर भारतीय साहित्यक्षेत्रातील, शिक्षण क्षेत्रातील थोर प्रतिभावंत साहित्यिक, संवेदनशील भावकवी, चित्रकार,संगीतकार म्हणून रवीन्द्रनाथ आपल्याला परिचित आहेत. 'बालसाहित्य' हा तर त्यांच्या अभिव्यक्तीचा अविभाज्य भाग आहे. *'दृष्टि पडे टापुर टूपुर नदेय एलो बान'* (टापूर टूपुर म्हणजे रिमझिम. किती सुंदर शब्द आहे न हा! उच्चारातच माधुर्य.) वयाच्या अवघ्या अकराव्या वर्षी लिहिलेली ही त्यांची पहिली कविता. ते १४ वर्षांचे असताना शारदादेवींचा, म्हणजे त्यांच्या आईचा मृत्यू झाला. त्यांच्या संवेदनशील मनावर पोरकेपणाचा आघात झाला. बालपणी त्यांना आईचं सुख लाभलं नाही. तरीही दुरून तिच्या डोळ्यात दिसलेलं वात्सल्य, क्वचित पाठीवरून फिरलेला हाताचा मऊ स्पर्श त्यांच्या मनात खोल दडून होता. जन्मभर जपून ठेवलेल्या त्या मातृस्पर्शाच्या बेलफुलांची उधळण त्यांनी आपल्या बालगीतांतून केली. मात्र त्यासाठीही आणखी एक आघात त्यांना पचवावा लागला. रवीन्द्रनाथांचे थोरले चिरंजीव रथीन्द्र १४ वर्षांचे असतानाच रवीन्द्रनाथांच्या पत्नी मृणालिनी देवी यांचं निधन झालं आणि मातृवियोगाचं दु:ख त्यांच्या मुलांच्याही वाट्याला आलं. तेव्हा मुलांचं मन रमवण्यासाठी या महान कवीनं 'शिशु' हा कवितासंग्रह लिहिला. त्यांच्या बालकविता म्हणजे मायलेकरातला हृद्य संवाद आहे. स्वत:च्या मुलांसाठी ते एकाच वेळी बाबा आणि आईही झाले ; मात्र त्यांनी निर्माण केलेलं काव्य अवघ्या मातृत्वासाठी,बाल्यासाठी एक भावसुंदर संवेदनमाला होऊन गेलीय. त्यातली विशिष्टता गळून तिला वैश्विकतेचं परिमाण लाभलंय. नोबेल पारितोषिकप्राप्त 'गीतांजलि' संग्रह केवळ अप्रतिम आहे. हरिभाऊ आपटे यांनी त्याचा सुंदर मराठी अनुवाद केलाय. विशेष म्हणजे वयाच्या ६९ व्या वर्षीही रवीन्द्रनाथांनी बालकविता लिहिल्या. आजही सुट्टीत त्यांच्या कवितांची माळ घराघरात जपली तर आपलं घर काही काळापुरतं का होईना 'शांतिनिकेतन' होईल. हे झालं सुट्टीपुरतं नि बालकांच्या भावविश्वातलं; पण आपल्या मोठ्यांसाठीही गुरूदेवांचं काव्य, कथा, आणि नाटके नित्य वाचनात असावीत अशीच आहेत.

'रवीन्द्र संगीत' ऐकणं हा आनंदानुभव आहे. त्यांच्या चित्रदुनियेत हरवून जाणं हे स्वत:ला शोधणं आहे. रवीन्द्रनाथ निसर्गाचं किती बारकाईनं आणि स्वस्थतेनं निरीक्षण करीत हे त्यांच्या प्रत्येक कृतीतून जाणवतं. आजच्या उगवत्या

पिढीसाठी तो आदर्शपाठ आहे. त्यांच्या लेखनातील मानवतावाद, तत्त्वज्ञान, आणि सौंदर्यदृष्टी आजही लिहित्या हातांना प्रेरणा देते. पु. ल. देशपांडे, वि. स. खांडेकर, ग. दि. माडगूळकर यांसारख्या साहित्यिकांनी टागोर शैलीतील सखोलता आणि भावविश्व जाणलं. मा. गो. काटकरांनी त्यांच्या 'Stray Birds'चा मराठी भावानुवाद करून आपल्या ओंजळीत अक्षरसत्त्व ठेवलंय. विलास गिते यांनी गुरूदेवांना आपलंसं करून दिलंय. त्यांच्या वैश्विक व सार्वकालिक विचारधारेनं मराठी साहित्यालाही समृद्ध केलंय.

वाचकहो, 'शांतिनिकेतन' विषयीही इथं थोडं सांगायला हवं. रवीन्द्रनाथांच्या शिक्षणविषयक तत्त्वज्ञानाचं मूर्त रूप म्हणजे शांतिनिकेतन. त्यांच्याच विचारानुसार 'शांतिनिकेतन'मधील मुक्त आणि सृजनशील शिक्षणपद्धती, प्रत्यक्ष निसर्ग सान्निध्यात झाडाखाली वर्ग भरवणं, कला-संगीत-नृत्य-हस्तकला या विषयांचं अभ्यासक्रमातील महत्त्व हे सारं आजही अनुकरणीय आहे. शांतिनिकेतनची पुढची पायरी म्हणजे विश्वभारती विद्यापीठ होय. जेथे आजही जगभरातून विद्यार्थी व शिक्षक एकत्र येऊन जागतिक बंधुत्व आणि संस्कृतीची देवाण-घेवाण शिकतात. शांतिनिकेतनमधील शिक्षण हे संपूर्ण जगासाठी एक आदर्श शिक्षण नमुना आहे. 'मूल्याधिष्ठित शिक्षण' हा गुरूदेवांच्या शिक्षणविषयक विचारांचा गाभा आहे.

मातृभाषेतून शिक्षण देण्यास त्यांनी उत्तेजन दिलं. गुरूदेवांचं ठाम मत होतं की, विद्यार्थ्याला आपल्या भाषेतूनच ज्ञान मिळाल्यास तो अधिक चांगल्या पद्धतीनं शिकेल. त्यांचे हे शिक्षणविषयक विचार केवळ शालेय शिक्षणापुरते मर्यादित नाहीत तर ते मानवी जीवनाच्या सर्वांगीण विकासाला स्पर्श करणारे आहेत.जीवन समजून घेण्याची ती एक सुंदर शाश्वत प्रक्रिया आहे.

वाचकहो, आपण पाहतोय की, आता देशभर नवं राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सुरू होतंय. बालवयात मुलांनी दोन भाषा शिकाव्यात की तीन? हिंदी शिकावी की नको याबाबत उलटसुलट चर्चा रंगतायत. पण शिक्षणाच्या मुळाशी ज्या भारतीय तत्त्ववेत्त्यांचं मन पोहचलं तिथपर्यंतचा आपला प्रवास कधी घडणार आहे? असं पाहा की, कुंभार चाकाच्या मधोमध विविध आकार घडवत असतो. खरंतर चाकाचा मध्य सर्वाधिक फिरतो; मात्र आपल्याला दिसायला तो अगदी स्थिर असतो. त्याप्रमाणे आपल्या मनाचंही आहे. तिथं सतत वेगवान फिरणारं असं एक सक्रिय केंद्र आहे, जे आपल्या जाणिवेत सहसा उतरत नाही. पण जर त्यावरच मन स्थिर करून आपण उत्तम संचित मिळवत राहिलो तर काही उदात्त घडवू शकू. कैक वर्षं आधी या थोर द्रष्ट्या विभूतींचा असाच प्रवास घडलाय. तो अक्षररूपात आपल्या समोर आहे. ज्ञान आणि अनुभव या दोन्ही वाटा त्यांनी आपल्यासाठी प्रशस्त करून ठेवल्यात. आपण 'त्या' वाटेचे वाटसरू होऊ या. त्यांनी शिक्षणाचं जे नित्यनूतन

व्रत आपल्याला दिलंय, मानवी सर्वकल्याणाचं स्वप्न दाखवलंय त्याचं नित्य संस्मरण आणि आचरण करू या. आज दिसणाऱ्या नवतेत या थोर विभूतींच्या शाश्वत मूल्यविचारांचीच बीजं आहेत हे जाणिवेत उतरवू या. रवीन्द्रनाथ म्हणतात, ‘A lamp can never light another lamp unless it continues to burn its own flame.’ एक दिवा दुसऱ्या दिव्याला तेव्हाच उजळवू शकतो जेव्हा तो स्वत:ची ज्योत अखंडपणे प्रज्ज्वलित ठेवतो. तद्वत आपण आपली प्राणज्योत सद्विचारांच्या चिंतनानं उजळवू म्हणजे आपला भवतालही उजळेल.

धन्यवाद.

**डॉ. प्रिया निघोजकर**
कार्यकारी संपादक

‘सळाळ आणि सळाळनंतर...’, ‘समांतर’, ‘मथितार्थ’, व ‘इत्यादी’ या कवितासंग्रहांनंतरचा श्री. भा. जोशी यांचा हा पाचवा कवितासंग्रह. समग्र समाजमन आणि कालखंड यांच्या सोबतीनं केलेला हा काव्यप्रवास वाचकांनाही समृद्ध असा अनुभव देईल असा...



त्यानंतर

श्रीपाद भालचंद्र जोशी

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)



बुद्धिबळाच्या विविध वैशिष्ट्यांचा... या खेळाच्या इतिहासातील अज्ञात वळणांचा... खेळाडूंच्या कर्तृत्वाचा... आणि चित्रपटातून दिसलेल्या बुद्धिबळ क्षेत्राचा मागोवा घेत बुद्धिबळ जगताची रोचक सफर घडवणारे पुस्तक.

६४ घरांच्या गोष्टी

रघुनंदन गोखले

किंमत : ₹ ४७५/- । (ट.ख. ₹ ५०)

# राजहंसी ग्रंथसृष्टी

## रोहिणी निरंजनी

*हे पुस्तक नंतरच्या सर्व पिढ्यांसाठी आरसा आहे. महाराष्ट्रात रोहिणीताईंचा नृत्यविचार कोणी पुढे नेला का, बंडखोरी झाली का, नृत्य चळवळ उभी राहिली का आणि नसेल, तर या सर्वांत उणिवा काय आहेत हे इच्छा असल्यास नक्की पडताळून पाहता येतील. त्याकरिता हे पुस्तक सर्वांनी जरूर वाचायला हवे.*

या आधी मी विदुषी रोहिणी भाटे लिखित 'लहजा'वर लिहिले होते. पण त्यांच्यावर आलेल्या चरित्रात्मक पुस्तकाविषयी मला लिहायचे आहे. डॉ. वंदना बोकील - कुलकर्णी लिखित राजहंस प्रकाशन प्रकाशित 'रोहिणी निरंजनी' हे पुस्तक मला अनेक अर्थाने महत्त्वाचे वाटत आहे. ते सर्व क्षेत्रातील वाचकांनी आणि मुख्यत: नृत्यक्षेत्रातील नव्या लोकांनी ते वाचावे ही माझी प्रामाणिक इच्छा आहे. वंदनाताईंनी अतिशय कष्टपूर्वक आणि अभ्यास करून या पुस्तकाला आकार दिला आहे. त्यातून मुख्यत्वे रोहिणीताईंचा नृत्यविचार सतत येत राहतो. त्यांचे हे तत्त्वज्ञान मला माझ्या नृत्यक्षेत्रातील मर्यादांसकट, जे काही आकळले आहे ते इथे लिहायचा प्रयत्न करतो.

हे आणि 'लहजा' हे पुस्तक जरी नृत्यविषयक चिंतन मांडणारे असले, तरी त्यातील गाभा हा कुठल्याही क्षेत्रात गंभीरपणे काम करणाऱ्या कोणालाही लागू पडतो. क्षेत्र बदलले तरी तत्त्व आणि मूल्य तीच राहतात. पंडित कुमार गंधर्व यांचे 'मुक्काम पोस्ट वाशी' हे पुस्तक याच जातकुळीचे आहे. कुमारजी असोत वा रोहिणीताई ते एका व्यापक अस्वस्थतेविषयी भाष्य करतात आणि नवतेचा ध्यास घेतात. कलेतून येणारी विशालता ते जसे दाखवतात, तसेच ती विशालता साध्य करताना येणारा विषाद दर्शवतात. कलेची शिखरे पादाक्रांत करताना पायतळी काय अंगारकाटे आहेत याचे दर्शन त्यातून घडते.

कोणतीही कला किंवा क्षेत्र ही एक तपश्चर्या असते, साधना असते. ती अव्यभिचारी निष्ठेने करावी लागते. ती साध्य करताना अपमान होतात, यातना होतात आणि प्रसंगी खचून जायला होते. पण ही निष्ठावान माणसे हा भवसागर पार कसा करतात, हे समजून घेण्यासारखे असते. अशा थोर पदाला पोहोचलेल्या लोकांच्या भोवती उत्तर आयुष्यात वलये तरी तयार होतात किंवा दंतकथेची जाळी! सुयोग्य मूल्यमापनाची

आणि परिशीलनाची सवय नसलेल्या आपल्या समाजात दिवे-ओवाळणी कार्यक्रम प्रामुख्याने घडतात. नाममाहात्म्य आणि व्यक्तिपूजा यातूनच तयार होते. या महान लोकांना गवसलेली मूलतत्त्वे प्रत्यक्ष आचरणात न आणता त्यांच्या नावाने फक्त कानाला हात लावला की विद्या प्राप्त झाली, असे शिष्यगणांस वाटते. त्यातही नृत्य आणि संगीतात गुरू-शिष्य परंपरा घट्ट रुतलेली आहे. रोहिणीताई त्याला 'गुरुबाजी' म्हणत. त्या या बुवाबाजी आणि त्याचसोबत नृत्यदुकानांच्या बाजारूपणाच्या विरुद्ध होत्या. महाराष्ट्रात एका विशिष्ट वयात घरातील मुलाला पोहायला जसे पाठवतात, तसे मुलीला नृत्यक्लासला धाडतात. गेल्या काही वर्षांत हे पेव फुटलेले आहे. स्मार्ट शिष्य काहीबाही थोडे शिकून स्वत:स आधी ताई, गुरुजी म्हणवून घेऊन नंतर 'विदुषी' आणि 'पंडित' ही स्वयंघोषित पदवी स्वत:च लावून घेतात. मग दिल्ली दरबार, संगीत नाटक अकादमी, पद्मश्री वगैरे. हा राग माझा नाहीये तर खुद्द रोहिणीताईंचा आहे. तो त्यांनी अनेकदा व्यक्त केला आहे. रोहिणीताईंना या सर्व गोष्टींचा तिटकारा असल्याचे दिसते. कलेतील या 'सेटिंग'च्या त्या विरुद्धच होत्या. या त्यांच्या सरळ आणि संकोची वृत्तीबाबत या पुस्तकात अनेक लोक आदराने बोलले आहेत.

रोहिणीताईंच्या नृत्यविचारात भाषेचे, वेळेचे, शब्दाचे आणि रियाजाचे अनन्यसाधारण स्थान होते. वैचारिक सुस्पष्टता होती. त्यांच्या रियाझाच्या व्याख्येत 'Musles (स्नायू)' तयार करण्याबरोबर 'Mind (मन)' घडवण्याला अधिक महत्त्व होते. आपण नृत्य का करत आहोत आणि त्यातून आपले काय 'सांगणे' आहे याची सखोल जाण होती. रोहिणीताईंसाठी नृत्यकला Product नव्हते तर Creation होते. Career नव्हते तर 'जीवनवृत्ती' होती.

या जीवनवृत्तीत त्यांची कला जगण्याशी एकसंध होती. जगण्यात भान असेल तर नृत्यात ते पाझरेल, हे त्यांचे मत होते. त्याकरता आपले जगणे घडवत नेता येते याचे




तुमच्या-आमच्या सध्याच्या जगण्यावरचा
तिरकस पण हसरा कटाक्ष!
विचारगर्भ पण मिस्कील भाष्य!
खेळकर शैलीतली मार्मिक निरीक्षणं!

निवडक **मंगला गोडबोले**

संपादन : वंदना बोकील-कुलकर्णी

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ३२५/- । (ट.ख. ₹ ५०)

असंख्य दाखले या पुस्तकात आहेत. वाचन, पाहणे, ऐकणे यावर त्यांचा जोर असे. त्यांची भाषातज्ज्ञ डॉ. अशोक केळकर, नाट्य-दिग्दर्शक विजया मेहता, नाटककार महेश एलकुंचवार, कवी पु. शि. रेगे, लेखक पु. ल. देशपांडे, कवी अशोक वाजपेयी, पंडित वसंतराव देशपांडे, पंडित कुमार गंधर्व, पंडित सुरेश तळवलकर अशा खरोखर विविध क्षेत्रांतील ज्ञानी माणसांशी मैत्री होती. ज्ञानसंचय करून त्यांच्या संवादातून त्या नवप्रेरणांचा शोध घेत होत्या. अनेक नव्या रचना करताना भारतीय साहित्य तर त्यांनी हाताळलेच पण फ्रेंच कवी बोदलेयरच्या कविता सादर केल्या. जागतिक कीर्तीच्या नृत्याचे आयाम बदलणारे 'मी इझाडोरा' हे बंडखोर आत्मचरित्र त्यांनी अनुवादित केले. अनेकांसोबत Collaboration करून निर्मिती केली. त्यांच्या गुरूंनी पंडित मोहनराव कल्याणपूरकर यांनी तर चक्क टॉलस्टॉयचे 'War and Peace' नृत्यनाट्य सादर केले होते.

हे वाचताना आजच्या काळाशी आपण तुलना करू लागतोच. आपण नवनिर्मिती करण्यात पुढे गेलोय की मागे रेटलो गेलोत? संस्कार,भारतीय परंपरा वगैरे नावाखाली नृत्यकला जुन्या चौकटीत ठोकली जात आहे का? याचा गंभीरपणे विचार व्हायला हवा. आपल्या क्षेत्रात आपल्या कामाचे उत्तम चिकित्सक टीकाकार नसतील आणि केवळ तोंडदेखले गोडपण असेल तर अध:पात नक्की ठरलेला असतो. क्षेत्र पुढे जायला बंडखोरी, भांडण आणि अपयश पत्करण्याची तयारी आवश्यक असते. रोहिणीताई मला तरी अशा दिसल्या. पुरोगामी विचार रुजलेले असताना जात - धर्म त्यांनी मागे टाकले होते. त्यांना सर्वांत राग कशाचा असेल तर Mediocrityचा! हे वैचारिक दारिद्र्य आणि अतिसामान्य संकुचितपण त्यांना त्रासदायक वाटे. त्यातून बाहेर पडायचा त्या अखंड प्रयत्न करत. आपली कवाडे उघडी ठेवून बाहेरच्या जगाचा वेध घेणे त्यांना आवश्यक वाटे. त्यांना अर्थहीन हालचाली म्हणजे नृत्य वाटत नसे. त्यात त्यांच्या मते 'आयुष्याचा आणि संस्कृतीचा अर्क' अनुभवाला यायला हवा. जशी


रागनिर्मितीचे एक-एक टप्पे समजून घेऊन त्या प्रक्रियेला मान्यता देऊन त्याप्रमाणे रागनिर्मितीचा रीतसर प्रयत्न कुमारजींनंतर सर्वप्रथम साधना शिलेदार यांनी केला आहे.
- मुकुल शिवपुत्र

लोकधुनांतून रागनिर्मिती

डॉ. साधना शिलेदार

किंमत : ₹ १३०/- । (ट.ख. ₹ ५०)




अभिनंदन!

## अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ यांच्यातर्फे प्रकाशन संस्थेला पुरस्कार



उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार २०२५
उत्तेजनार्थ ललित विभाग

◆

**सो कुल.. टेक २**




(संदर्भग्रंथ) प्रथम पुरस्कार
२०२५

◆

**वस्त्रगाथा**

---

## महाराष्ट्र साहित्य परिषद, दामाजीनगर शाखा मंगळवेढा, जि. सोलापूर

अभिनंदन!

## यशोदा प्रतिष्ठान संचलित सनराईज पब्लिक स्कूल अँड ज्यु. कॉलेज, शेळवे (ता. पंढरपूर)

श्री. गिरीश पंडित पुरस्कृत

मारोतीराव पंडित स्मृती पुरस्कार






सनराईज राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार (ललित) आत्मकथन

**दौशाड** ◆ डॉ. नंदकुमार राऊत

साहित्य, नाटक, चित्रपट यांच्यात चळवळ झाली तशी त्यांना नृत्यचळवळ अभिप्रेत होती. त्यात परंपरा पचवून नवतेची आस होती. प्रवाही संस्कृती त्यांना अपेक्षित होती. त्याबाबत त्या सजग होत्या. निर्भीड होत्या.

या पुस्तकात वंदनाताईंनी रोहिणीताई आणि १९६०-१९८० हा काळ यांची सांगड घालायचा प्रयत्न केला आहे. या काळातील विविध क्षेत्रांतील प्रवाह काय करत होते याची नोंद घेतली आहे. त्यामुळे रोहिणीताईंचा नृत्यविचार त्या पटावर ठेवून जोखता येतो. स्थाननिश्चिती करता येते. अधिक-उणे समजते. काळाचे प्रभाव दिसतात आणि व्यक्तीची हतबलताही दिसते. आपापल्या काळातील समविचारी माणसे जसजशी निघून जातात, तसतसे नव्या पिढीशी येणारे तुटलेपण उमगते. शब्दांचे अर्थ पातळ किंवा पुसट होत जाणाऱ्या काळात रोहिणीताई अधिक अंतर्मुख झालेल्या होत्या याचे चित्रण वंदनाताईंनी केले आहे. व्यक्तीचे चरित्र म्हणजे फक्त यशाची मालिका न ठेवता अपयशाच्याही कथा असायला हव्यात. Failures सांगायला अंगी फार धाडस लागते. त्याची दखल वंदनाताईंनी नेटकेपणाने घेतली आहे.

मुखपृष्ठ आणि आतील मांडणी ज्येष्ठ चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी यांची आहे. ती देखणी तर आहेच, पण नृत्याच्याच भाषेत बोलायचे तर डौलदार आहे.

तर एकूण काय तर हे पुस्तक नंतरच्या सर्व पिढ्यांसाठी आरसा आहे. महाराष्ट्रात रोहिणीताईंचा नृत्यविचार कोणी पुढे नेला का, बंडखोरी झाली का, नृत्य-चळवळ उभी राहिली का आणि नसेल तर या सर्वांत उणिवा काय आहेत हे इच्छा असल्यास नक्की पडताळून पाहता येतील. त्याकरता सर्वांनी हे पुस्तक जरूर वाचायला हवे.

***अतुल पेठे***

९४२२३१९७१७

कलामाध्यमाची साधना करणाऱ्या विचारवंत, संगीतरचनाकार, वाग्गेयकार, लेखिका, विद्यापीठीय चर्चेत नृत्यशिक्षण व नृत्यविचार यांचा समावेश करणाऱ्या ॲकॅडेमेशियन - अशा परिपूर्ण कलाकार - 'टोटल आर्टिस्ट' - रोहिणी भाटे यांचं नृत्यक्षेत्रातील योगदानही स्वाभाविकच बहुआयामी, विविधरंगी! त्यांच्या प्रातिभ कलाजीवनाचा वेधक पट.

रोहिणी निरंजनी

वंदना बोकील-कुलकर्णी

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)



अभिनंदन!

## महाराष्ट्र साहित्य परिषद, दामाजीनगर शाखा मंगळवेढा, जि. सोलापूर



डॉ. शरद शिर्के पुरस्कृत
मातोश्री इंदुमती शिर्के
स्मृती पुरस्कार

**गोंदणखुणा**

◆

डॉ. प्रिया निघोजकर



अभिनंदन!

## महाराष्ट्र साहित्य परिषद शाहूपुरी शाखा, सातारा



उत्तम बंडु तुपे
कादंबरी पुरस्कार

**बाय गं...**

◆

विद्या पोळ - जगताप



अभिनंदन!

## सार्वजनिक वाचनालय, नाशिक



धनंजय कुलकर्णी पुरस्कार
(कादंबरी विभाग)

**सवाष्ण**

◆

डॉ. क्षमा गोवर्धने शेलार



# महर्षी ते गौरी

*महर्षी धोंडो केशव कर्वे यांना १९५८ साली 'भारतरत्न' या सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरवण्यात आले. मंगला आठलेकर लिखित 'महर्षी ते गौरी' हे पुस्तक 'राजहंस'ने प्रकाशित केले. त्यातील हा संपादित अंश.*

स्त्रीशिक्षण आणि स्त्रियांचा उद्धार हेच आपल्या जीवनाचं श्रेयस मानणाऱ्या महर्षी कर्व्यांचं बालपण चार सर्वसामान्य मुलांसारखंच गेलं. केवळ बालपणच नव्हे, तर वयाच्या जवळजवळ तिशीपर्यंत विशिष्ट सामाजिक कार्याचे काही विशेष ध्यास कर्व्यांच्या मनाला होते, असे उल्लेख त्यांच्या आत्मचरित्रातही सापडत नाहीत. तरीही इतर समवयस्क मुलांपेक्षा त्यांच्या मनाची घडण निश्चितच वेगळी होती. कॉलेजचं शिक्षण पूर्ण होईपर्यंत शिकवण्यांचे जे पैसे मिळत, त्यातील रुपयाला एक पैसा याप्रमाणे धर्मादायासाठी ते बाजूला काढून ठेवत. पुढे एल्फिन्स्टन कॉलेजात नोकरीला लागल्यानंतर आपल्या मासिक प्राप्तीच्या पाच टक्के रक्कम ते अशा कार्यासाठी बाजूला ठेवत. यावरून त्यांच्या मनातील दयाभाव, मदत करण्याची वृत्ती स्पष्ट होते पण सामाजिक कार्य म्हणून नेमकं काही करावं, अमुक एका सामाजिक घटकाच्या कल्याणासाठी काही विशिष्ट कार्य करावं, हे त्यांच्या डोळ्यांसमोर स्पष्ट नव्हतं. तरी शिकणाऱ्या होतकरू विद्यार्थ्यांना ते मदत करीत, यावरून शिक्षणाचं त्यांना कळलेलं महत्त्व व त्यासाठी आपला वेळ, पैसा देण्याची त्यांची तयारी किती होती हे स्पष्ट होतं. कर्व्यांनी एका विधवेशी पुनर्विवाह केला नसता, तर त्यांनी शिक्षणक्षेत्रातच काही काम केलं असतं. कारण विधवेशी विवाह केल्यानंतरही स्त्रियांच्या प्रश्नांचा विचार करताना नंतरच्या काळात त्यांनी स्त्रीशिक्षणालाच प्राधान्य दिलं व स्त्रियांसाठी स्वतंत्र शिक्षणसंस्था सुरू केलेल्या दिसतात.

पण एकंदरीतच स्त्रीच्या उद्धारकार्यासाठी कर्व्यांच्या आयुष्याची जोड कशी जमली? त्यांच्याभोवती कोणकोणत्या नात्यानं कोणकोणत्या परिस्थितीतल्या स्त्रिया आल्या? त्यांची दुःखं कर्व्यांच्या मनावर काही परिणाम करून गेली का? त्या काळचा समाज,

स्त्रीचं जगणं या संदर्भात त्यांचं मन काही वेगळा विचार करीत होतं का? तसं असेल तर वयाच्या तिशीपर्यंत स्त्रियांच्या प्रश्नांच्या संदर्भात कर्व्यांनी काहीच पाऊल का उचललं नाही? असे अनेक प्रश्न निर्माण होतात. कदाचित घरचं दारिद्र्य, चिंता, माणसांचा मोठा रगाडा, स्वत:चं शिक्षण पूर्ण करण्यासाठी करावी लागणारी धडपड या साऱ्यात त्यांच्या मनाला 'सामाजिक प्रश्न' म्हणून स्त्रीच्या दु:खाची जाणीव झाली नसावी.

वयाच्या पंधराव्या वर्षी कर्व्यांचं लग्न झालं आणि विसाव्या वर्षानंतर त्यांच्या वैवाहिक जीवनाला सुरुवात झाली. चोविसाव्या वर्षी त्यांना रघुनाथ झाला, मग कर्व्यांनी अर्थार्जनासाठी नोकरी पकडली आणि खऱ्या अर्थानं त्यांच्या गृहस्थधर्माला प्रारंभ झाला. माणसाच्या आयुष्याची दिशा बदलते, ती तसेच काही तीव्र दु:खाचे प्रसंग त्याच्यावर ओढवतात तेव्हा! वयाच्या तिशीपर्यंत साधं सरळ असलेलं कर्व्यांचं आयुष्य, त्यांच्या पत्नीच्या, राधाबाईंच्या निधनानं अंतर्बाह्य बदलून गेलं. कर्वे अनुभवत असलेल्या पत्नीवियोगाच्या दु:खाची तीव्रता त्यांच्या भोवतीच्या लोकांना जाणवणं शक्य नव्हतं, कारण दु:खाचं प्रदर्शन करणं हा त्यांचा स्वभाव नव्हता. अतिशय कठोर मनानं या दु:खावर मात करून १५ नोव्हेंबर १८९१ला पुण्याला जाऊन फर्ग्युसन कॉलेजमध्ये गणिताचा प्राध्यापक म्हणून त्यांनी नोकरी सुरू केली.

राधाबाईंच्या मृत्यूनंतर विधुरावस्थेत पुढचं आयुष्य घालवण्यापेक्षा इतर कोणत्याही पुरुषाप्रमाणे पुनर्विवाह करण्याच्या दृष्टीनं कर्व्यांच्या मनाची तयारी सुरू झाली आणि विधवेशी विवाह करण्याचा कर्व्यांचा निर्धार पक्का झाला. आपले मित्र नरहरपंत जोशी यांच्या विधवा बहिणीशी, गोदूबाईशी कर्व्यांनी पुनर्विवाह केला.

महर्षी कर्वेंनी केलेला विधवाविवाह हा या अर्थानं समाजातल्या अनेक लोकांना, 'आपल्या विधवा मुलीच्या संदर्भात काय करावं' याचं मार्गदर्शन करणारा होता. पण कर्व्यांना जे जमलं ते इतरांना तितक्या सहज जमलं नाही. कारण अनिष्ट रूढी





महर्षी कर्वे, र. धों. कर्वे आणि गौरी देशपांडे ही तीन नावे म्हणजे स्त्री-स्वातंत्र्याच्या प्रश्नांशी जोडलेल्या कर्वे घराण्याच्या तीन पिढ्या! स्त्री-स्वातंत्र्याचा इतिहास समजून घ्यायचा, तर या व्यक्तींची चरित्रे समजून घ्यावी लागतील. हा आहे या तीन पिढ्यांचा वेचक, ठळक इतिहास...!

**महर्षी ते गौरी**

मंगला आठलेकर

आवृत्ती चौथी । किंमत : ₹ १५०/- । (ट.ख. ₹ ५०)

मोडल्या पाहिजेत हा विचार पटणं वेगळं आणि ती रूढी मोडण्यासाठी स्वत: सिद्ध होणं वेगळं!

एकोणिसाव्या शतकाअखेर स्त्रियांचा स्वत:कडे, स्वत:च्या जीवनाकडे पाहण्याचा जो दृष्टिकोन होता, त्यात काही बदल झालाच तर तो फक्त शिक्षणानंच होऊ शकतो, हे कर्व्यांच्या लक्षात आलं होतं. आपलं दु:ख हे आपल्यावर लादलं गेलेलं दु:ख आहे, हेही या स्त्रियांना कळत नव्हतं. नशिबाचा एक भाग म्हणूनच त्या या दु:खाकडे बघत होत्या. या स्त्रियांच्या मनोवृत्तीत बदल करण्याचं सामर्थ्य फक्त शिक्षणातच आहे अशी कर्व्यांची ठाम श्रद्धा असल्यानं त्यांनी विधवांच्या आश्रमाबरोबरच शिक्षणसंस्थाही स्थापन करण्याच्या दृष्टीनं हालचाल सुरू केली.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस इंग्रजांच्या कृपेनं शिक्षणाचं महत्त्व आपल्या लोकांना कळू लागलं खरं, पण सर्वच बाबतींत मागासलेल्या आणि धर्माधर्माच्या अत्यंत खुळ्या समजुती मनात बाळगणाऱ्या आपल्या पुरुषप्रधान समाजाला 'स्त्रीनं शिक्षण घ्यावं' ही कल्पना पचनी पडण्यासारखी नव्हती. त्यातही ज्या काळात स्त्रियांना घराबाहेरही पडण्याची परवानगी नाही अशा काळात त्यांनी शाळेत जाऊन शिकावं, या गोष्टीला समाजाची अनुमती मिळण्याची सुतराम शक्यता नव्हती. अशा वेळेस स्त्रियांना शिक्षण मिळालंच पाहिजे हा ध्यास कर्व्यांच्या मनानं घेतला. दु:खी आणि पीडित विधवेचा उद्धार केवळ पुनर्विवाहाने नाही तर तिला शिक्षण मिळून स्वत:ची ओळख पटण्यानं होणार आहे आणि हेच महत्त्वाचं काम आता आपल्याला करावयाचं आहे हे त्यांनी ठरविलं.

कर्व्यांनी हाती घेतलेलं प्रत्येक कार्य त्या काळातील समाजाच्या कोणत्या ना कोणत्या गटाला नाराज करणारं असल्यामुळे, प्रत्येक वेळी त्यांना विरोधाला सामोरं हे जावंच लागलं. पण आपल्या भूमिकेचं, हेतूचं समर्थन करण्याच्या फंदात न पडता, वाद-प्रतिवाद न करता, या सर्व विरोधाकडे पूर्ण दुर्लक्ष करून शांतपणे कर्व्यांनी आपलं काम चालू ठेवलं.




स्त्रियांसाठी स्वतंत्र संस्था काढणं यात केवळ सहशिक्षणाला विरोध करणं, असा अण्णा कर्व्यांचा हेतू नव्हता. परिस्थिती बदलेल तेव्हा लोकमत सहशिक्षणाला अनुकूल होईल. ते होईल तेव्हा होईल, पण तोपर्यंत ज्यांना आपल्या मुलींना शिकवावंसं वाटतं, त्यांनी काय करावं? स्त्रियांसाठी स्वतंत्र शिक्षणसंस्था स्थापन करण्यामागे कर्व्यांचा नेमका हाच हेतू होता.

स्त्रिया शिकल्या तर बोलतील, स्वत:ची

बाजू मांडतील, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनतील म्हणून त्यांनी शाळांची स्थापना केली. पण समाजाच्या परिवर्तनाच्या प्रक्रियेत सहभागी होण्याच्या दृष्टीनं स्त्रियांनी आपली उन्नती करून घ्यावी, त्यांची वाटचाल मानसिक प्रगल्भतेच्या दिशेनं व्हावी, समाजव्यवस्थेच्या काचातून त्यांची सुटका व्हावी; याहीपेक्षा स्त्रियांसाठी शाळा काढणं आणि आश्रम स्थापन करणं यांवरच कर्व्यांचा अधिक भर राहिला.

महर्षी कर्वे यांनी काळाच्या आणि समाजाच्या चौकटीत आपल्या ताकदीनुसार अतिशय चिकाटीनं आणि निग्रहानं जे काम केलं, ते स्त्रियांना समाजात उभं राहण्यास मदत करणारं होतं यात शंका नाही.

❖


अभिनंदन!

मराठी विज्ञान परिषद





उत्कृष्ट विज्ञान पुस्तक
पुरस्कार

**आपले वर्तन ↔ आपला मेंदू**

◆

डॉ. आनंद जोशी
सुबोध जावडेकर



अभिनंदन!

आपले वाचनालय, इंदौर व
‘श्री सर्वोत्तम’ यांच्या संयुक्त विद्यमाने



कविवर्य वसंत राशिनकर स्मृती
अखिल भारतीय उत्कृष्ट
काव्यसंग्रह पुरस्कार

**आतून उगवलेल्या
कविता**

◆

प्रा. प्र द. कुलकर्णी



*हजारो वर्षांच्या परंपरेचे पाथेय आपल्या अक्षरवाङ्मयातून पुढील पिढ्यांना देणारी, संस्कारशील असूनही आपले स्वयंभूपण आणि मूलकंद जपणारी आपली मातृभाषा मराठी अनेक वर्षांच्या प्रयत्नांनंतर या वर्षी घटस्थापनेच्या मुहूर्तावर अभिजात भाषांच्या पंक्तीत विराजमान झाली आहे. मायमराठीच्या समृद्ध ठेव्यातील भाषेची सौंदर्यस्थळे व सामर्थ्यस्थळे अंशरूपाने वाचकांसमोर ठेवणारे हे सदर. अखेर 'पिंडी ते ब्रह्मांडी...'*

*पत्र-वाङ्मय हा आता मराठी साहित्यात अभिव्यक्तीचा एक स्वतंत्र प्रकार म्हणून रूढ झाला आहे. 'विश्रब्ध शारदा'च्या तीन खंडांच्या रूपाने ह. वि. मोटे यांनी मराठी वाचकांसाठी पत्र-वाङ्मयाचा मौलिक ठेवा उपलब्ध करून दिला आहे. मातृदिनाच्या निमित्ताने पहिल्या खंडातील दोन महत्त्वाची पत्रे येथे देत आहोत. पहिले पत्र कवी रेव्ह. ना. वा. टिळक यांनी त्यांच्या पत्नी 'स्मृतिचित्रे'कार लक्ष्मीबाई टिळक यांना लिहिलेले आहे व दुसरे पत्र बालकवींनी देवदत्त टिळक यांना महाबळेश्वरहून पाठवलेले आहे.*

---

पांचगणी : १०.५.१९१४

प्रीतिपूर्वक सा. न. वि. वि. - हा मायना वाचून तुम्हाला आश्चर्य वाटेल; पण आज मी हें पत्र मातृदिनाच्या परममंगल प्रसंगी आपल्या अत्युच्च पदावर विराजमान झालेल्या माझ्या मातृभक्त मुलांच्या मातेला लिहीत आहे. अर्थात् मला आज त्या पदाला मान देऊन जें लिहायाचें तें लिहिलें पाहिजे. मातृपद राजपदापेक्षां थोर आहे. मानवी सृष्टीचें बरेवाईट करणें जितकें मातेच्या हाती आहे त्याच्या शतांश सुद्धां राजाच्या हातीं नाहीं. जगाला उत्तमोत्तम राजे, वज्रहृदयी महावीर, बुद्धिमत्तेचे महासागर असे पंडित, इकडची पृथ्वी तिकडे करणारे व्यवसायी, पंचमहाभूतांचे दास करून घेणारे शास्त्रज्ञ पुरुष, जगाला गदागदा हालविणारे महाकवि, ज्यांच्या यशाला प्रत्यक्ष अमृत लाजेल असल्या महासाध्वी मातेनें दिल्या आहेत. असल्या प्रभावशाली मातृपदावर विराजमान

झालेल्या दिव्य विभूतीला –माझ्या भाग्यशालिनी पत्नीला - मी हे पत्र लिहीत आहे. हे मला जपून लिहिलें पाहिजे. ह्या पदाचा माझ्या हातून चुकुनही अपमान होऊ नये म्हणून मला जपले पाहिजे; नाहीं तर ज्या परमेश्वराने परम प्रेमानें जगांत ह्या पदाची स्थापना केली, त्याचा मजवर रोष होईल.

गृह म्हणजे गृहिणी - मातृपदार्थ सिद्ध राहणारी युवराज्ञी. गृहपति हा ह्या युवराज्ञीचा नुसता मंत्री होय. ही युवराज्ञी मातृपदावर विराजमान झालेली पाहून, तिला आपले सर्वस्व आपल्या प्रजेला वाहतांना पाहून, ह्या मंत्र्याला केवढा आनंद होतो हे त्याचा तोच जाणो! मला ह्या आनंदाचा अनुभव आहे, आणि तो देणारीचा म्हणजे तुमचा मी अत्यंत ऋणी आहे.

तुम्ही अत्यंत प्रेमळ खऱ्या खऱ्या पतिप्राणा पत्नी आहां ह्याबद्दल मी परमेश्वराचा सदैव ऋणी आहेच. परंतु त्यापेक्षांहि अधिक ऋणी तुम्ही सर्वोत्कृष्ट माता आहां म्हणून आहे.

आज मी मातेचे वात्सल्य आणि संततीचें मातृप्रेम ह्यांचें मधुर संमीलन पाहून आपल्या नेत्रांचे पारणें फेडायला नगरास नाहीं. तरी कांहीं प्रमाणानें मला तें मनोमन फेडून घेता येत आहे.

ह्या मातृदिनाच्या योगानें माझें गृहप्रेम परिवृद्ध आणि परिशुद्ध केलें आहे. ह्यानें जशी माझ्या तशीच तुमच्याहि लक्षांत आपली पहिली आणि शेवटली जबाबदारी आणून दिली असेल. आपल्या देवाला सत्त्वधीर, एक-निष्ठ भक्त पाहिजे आहेत. आपल्या देशाला खरे, स्वत:ला विसरून त्याची सेवा करणारे सेवक पाहिजे आहेत. आपल्या समाजाला अत्यंत शूर पुरस्कर्ते पाहिजे आहेत. ह्या तिघांचे आपण ऋणी आहों. हें ऋण फेडायाचें म्हणजे आपण ह्यांना जे हवें आहे तें दिलें पाहिजे. दत्त आणि तारा ह्यांना अशा रीतीनें सिद्ध करणें हेंच आपले कर्तव्य आहे.

हे कर्तव्य करण्यास सामर्थ्य पुरविणारा जो सकळ जगताचा पिता आणि माता त्याची प्रार्थना करून आजचा उत्सव करा. तोच तुम्हांला पूर्णपणे आशीर्वादित ठेवो.

तुमचा अत्यंत प्रिय पति<br>
नारायण वामन टिळक

---

महाबळेश्वर : १८-४-१९१३

श्री

प्रेमपूर्वक सा. न. वि. - आपणास पुष्कळ दिवसांत पत्र पाठविलें नाहीं, ह्याचीं पुष्कळशी कारणें आहेत. पण तीं देत बसण्यांत कायगाठी हशील आहे? आता कसल्याही प्रकारचा विचार न करतां, नुसती मौज करण्यासाठीं म्हणून महाबळेश्वरीं

## वाचकांचा उदंड प्रतिसाद लाभत असलेली 'राजहंसी' पुस्तके



भवतालाचं भान राखत, निरीक्षणं नोंदवत नाट्यकलेतील सर्जनप्रक्रिया मांडत एका नाट्यकर्मी-दिग्दर्शकानं लिहिलेलं हे नाट्यचरित्र. नाट्यकलेविषयी व्यापक दृष्टी देणारं, विविधांगी अनुभवांचं संचित वाचकांपुढे ठेवणारं हे पुस्तक.

### चंद्रकांत कुलकर्णी सादर करीत आहे...

चंद्रकांत कुलकर्णी

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ८००/- । (ट.ख. ₹ ५०)



एव्हरेस्ट शिखर सर करण्याच्या अनावर ओढीपायी तीन पिढ्यांमध्ये निर्माण झालेले ताणतणाव, संघर्ष आणि परस्परांना समजून घेण्याचे प्रयास चित्रित करणारी, सत्यघटनेवर आधारित कादंबरी!

### ज्याचं त्याचं एव्हरेस्ट

मृणालिनी चितळे

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)




'लैंगिकता' या मानवी नात्यांतील मूलभूत पैलूविषयी शास्त्रीय पद्धतीनं भाष्य करत, उत्तम सहजीवनाचा मूलमंत्र देणारं, ज्येष्ठांच्या सहजीवनाचं महत्त्व अधोरेखित करणारं एक आगळंवेगळं पुस्तक.

### देहभान
लैंगिकतेविषयी जाणून घेऊ या...

निरंजन मेढेकर

किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)

आलों आहे. खरोखरच मनाला फार बरें वाटतें. मध्यंतरी, मला जें वेड्यासारखं होत असे, त्याचा आतां पत्ता नाहीं. निसर्गजननीच्या ह्या उदात्त आणि गंभीर दर्शनानें मला काय वाटतें तें लौकरच मी कवितारूपानें आपणांस कळवीन. विशाल गिरिशिखरें, गर्द अरण्यें, भयाण खोरीं, अजस्त्र प्रपात, ह्या सर्वांचें दर्शन, अहाहा! मला किती आनंददायक वाटतें. ह्याची प्रिय बंधु, तूंच कल्पना कर. त्याकडे पाहतां पाहतां एक गोड वेड माझ्या डोक्यांत उसळतें. कल्पनासाम्राज्यांतील मधुर स्वप्नसृष्टीशीं मन संलग्न होतें. विचारांचा विलक्षण प्रवाह सुरू होतो, ज्या विश्वजननीचें मी मूल आहें तिचाच सगळा हा अवाढव्य विस्तार - ती किती तरी विशाल असेल - पण असे ना का! ती माझी प्रेमळ आई आहे! तिला लहानमोठें ठाऊकच नाहीं.

पत्र संपलें. हृदय भरलेलेंच आहे.

त्र्यंबक

(बालकवी उर्फ त्र्यंबक बापुजी ठोंबरे)

❖

आयुष्याचे ध्येय ठरवताना कधीकधी स्वत:ची आवड ठाऊक नसते. कधीकधी नवीन संधी कुठे उपलब्ध आहेत हे माहीत नसते. अशा वेळी गरज असते अनुभवी मार्गदर्शकाची. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शंकाचे निरसन करणारे पुस्तक पालकांनाही नव्या वाटा दाखवेल.




करिअर कसं निवडावं?

प्रश्नोत्तरातून शंका समाधान

डॉ. श्रीराम गीत

आवृत्ती बारावी । किंमत : ₹ २२५/- । (ट.ख. ₹ ५०)




आंतरराष्ट्रीय कीर्तीचे खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांच्या प्रतिभाविलासातून फुललेल्या या पाच विज्ञान कादंबऱ्या वाचकाला जणू कालयंत्रातून भूत-भविष्य-वर्तमानाची सफर घडवतात...

समग्र जयंत नारळीकर

डॉ. जयंत नारळीकर

किंमत : ₹ ८००/- । (ट.ख. ₹ ५०)

## भारतीयत्व समजून घेण्यासाठी वाचायला हवीत अशी ‘राजहंसी’ पुस्तके




काश्मीरमधील प्रत्यक्ष जनजीवन जाणून घेण्यासाठी एकट्या स्त्रीनं केलेला हा धाडसी प्रवास तेथील निसर्गसौंदर्याबरोबरच पाहुण्याची ‘मेहमाननवाजी’ करणाऱ्या व अस्थिर जीवनाला सामोरे जाणाऱ्या काश्मिरी कुटुंबाचं प्रत्ययकारी दर्शन...

### काश्मिरियत

सीमेवरच्या एकल प्रवासाची सत्यकथा

सुप्रिया राज

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)

कलम ३७० रद्द करण्याच्या ऐतिहासिक निर्णयाने उठलेले वादळ, निर्माण झालेले वैधानिक व भावनिक प्रश्न, अनुत्तरित व संवेदनशील काश्मीर प्रश्न आदींची सखोल आणि साक्षेपानं केलेली चर्चा




### कलम ३७०

आग्रह आणि दुराग्रह

माधव गोडबोले

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ १५०/- । (ट.ख. ₹ ५०)




पाकिस्तानचा इतिहास, संस्कृती, राज्यव्यवस्था, राजकारण, अर्थव्यवस्था, सामाजिक बांधणी आदींचा घेतलेला वेध; तसंच स्वतंत्र, सार्वभौम आणि एकसंघ राष्ट्र म्हणून पाकिस्तानचं भवितव्य काय असेल याविषयी केलेलं साक्षेपी विवेचन.

### पाकिस्तान का मतलब क्या?

श्रीधर लोणी

किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)

## ‘राजहंसी’ विविधा




भारतीय रंगमंचावरील कर्तबगार रंगकर्मी, दिग्दर्शिका, अभिनेत्री, लेखिका या विविधांगी भूमिकेतील स्त्री-कलावंतांच्या व्यक्तित्वाचा आणि कर्तृत्वाचा वेध... वीस दिशादर्शक प्रश्नांच्या अनुषंगाने सर्जनशील रंगकर्मींचे हे विचार म्हणजे वाचकांसाठीचा समृद्ध ठेवा...

### वीस प्रश्न

संकल्पना आणि संकलन : महेश एलकुंचवार

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ २२०/- । (ट.ख. ₹ ५०)

डॉक्टर-पेशंट नात्यात विसंवाद निर्माण होण्यास कारणीभूत ठरते वैद्यकीय व्यवसायातील चुरस! वैद्यकीय प्रवेशांतील गोंधळ, याविरुद्धचा लढा, प्रशासन-विद्यार्थी-पालक आणि माध्यमे यांनी एकमेकांवर व न्याययंत्रणेवर टाकलेले डावपेच या साऱ्यांचा, प्रत्यक्ष सहभागी झालेल्या तज्ज्ञाने घेतलेला वृत्तान्तवेध म्हणजे हे पुस्तक -

### शह आणि काटशह
वैद्यकीय व्यवसायातील चुरस

डॉ. राजीव जोशी

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)






ही कहाणी आहे एका आधुनिक सुश्रुताची... तसंच हा आहे ‘पुणे टेक्निक’ हे नवं शल्यतंत्र विकसित करणाऱ्या सुप्रसिद्ध शल्यचिकित्सक डॉ. शैलेश पुणतांबेकर यांच्या अनोख्या प्रवासाचा घेतलेला वेध...

### स्कालपेल ते स्कोपी ते रोबो

डॉ. चित्रलेखा पुरंदरे

किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)

# असे जन्मले पुस्तक

## मिरॅकल

*मानवी जीवनात घडणाऱ्या घटना, त्यांतून व्यक्त होणाऱ्या विविध भावभावना, मानवी नातेसंबंध, अनुभवाला येणारे जय-पराजयाचे सुखदुःख व आशानिराशेचे क्षण अशी वेडीवाकडी वळणे घेत जीवन पुढे जात असते.*
*वाचकांना कथा वाचताना कथेतील पात्रे या वळणावरून जीवनाचा प्रवास करत आहेत हे जाणवले की वाचकांना ती कथा आपली वाटू लागते. ही सहजप्रवृत्ती लक्षात घेऊन मी विज्ञानकथा-लेखन केले आहे.*

विद्यार्थिदशेपासून मला विज्ञानकथा वाचनाची व लिहिण्याची आवड आहे. देशातील, परदेशातील लेखकांच्या विज्ञानकथा, अनुवादित कथा व मराठी विज्ञानकथा मी वाचल्या आहेत. त्या वाचनातून मला जाणवले की बहुतेक विज्ञानकथा मानवी जीवनापासून दूर आहेत. भविष्यातील एखादी विज्ञान-संकल्पना, मानवी जीवनाचे आभासी चित्रण, काल्पनिक वर्णने व मानवी भावभावनांचा अभाव अशा वैशिष्ट्यांमुळे बहुसंख्य वाचकांना विज्ञानकथा फारशी आकर्षित करू शकत नाही. त्यामुळे विज्ञानकथांचा वाचकवर्ग मर्यादित आहे. म्हणून मी माझ्या विज्ञानकथा-लेखनाची भूमिका 'जरा हटके' घेतली. मानवी जीवनात घडणाऱ्या घटना, त्यांतून व्यक्त होणाऱ्या विविध भावभावना, मानवी नातेसंबंध, अनुभवाला येणारे जय-पराजयाचे सुखदुःख व आशानिराशेचे क्षण अशी वेडीवाकडी वळणे घेत जीवन पुढे जात असते. वाचकांना कथा वाचताना कथेतील पात्रे या वळणावरून जीवनाचा प्रवास करत आहेत हे जाणवले की वाचकांना ती कथा आपली वाटू लागते. ही सहजप्रवृत्ती लक्षात घेऊन मी विज्ञानकथा-लेखन केले आहे. आणखी एक नोंद घेण्याजोगा मुद्दा म्हणजे क्लोनिंग, ब्लॅक होल्स, टाइममशीन, चिरतरुण राहण्याचे संशोधन, सरोगेशन,



किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

समांतर विश्वकल्पना अशा चाकोरीबद्ध विज्ञानसंकल्पनांऐवजी मानवी जीवनाशी निगडित असणाऱ्या विज्ञानसंकल्पना मी माझ्या कथेत घेतल्या आहेत. विज्ञानक्षेत्राशी संबंधित असणाऱ्या वाचकांबरोबरच जे वाचक विज्ञानक्षेत्राशी संबंधित नाहीत अशा वाचकांना डोळ्यांसमोर ठेवून मी विज्ञानकथांचे लेखन केले आहे.

विज्ञानकथा लिहिताना विज्ञान आणि साहित्य यांची बेमालूम सांगड घालणे, विज्ञानसंकल्पनेची अचूकता ठेवणे, कथा ओघवती व मनोरंजक करण्यासाठी प्रसंगांची जुळवाजुळव करणे, विज्ञानसंकल्पना वाचकांना समजावी यासाठी ती सहज व सोप्या शब्दांत मांडणे, शक्यतो कथा रहस्यमय बनवणे; या सर्व बाबी सांभाळणे म्हणजे तारेवरची कसरत आहे. कथेच्या लेखनाच्या पहिल्या दोन प्रयत्नांत हे सर्व जुळून येत नाही. तिसऱ्या प्रयत्नात मात्र या सर्व गोष्टी जुळून येतात व मनाजोगती विज्ञानकथा कागदावर उतरवल्याचे समाधान लाभते. माझ्या काही विज्ञानकथांना राज्यस्तरीय कथास्पर्धेत उत्कृष्ट कथा म्हणून पुरस्कार मिळाले आहेत, तर काही विज्ञानकथा नावाजलेल्या दिवाळी अंकांत प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यामुळे विज्ञानकथा लिहिताना जे परिश्रम घेतले, त्याचे चीज झाले असे वाटते.

अनेक समीक्षकांनी 'मिरॅकल'ची मुक्त कंठाने प्रशंसा केली आहे. त्यामुळे ज्या भूमिकेतून मी पुस्तक लिहिले, ती भूमिका योग्य आहे यावर शिक्कामोर्तब झाले. 'मिरॅकल'ला तितिक्षा इंटरनॅशनल, पुणे, साहित्य विहार संस्था (नागपूर), कुंडल-कृष्णाई प्रतिष्ठान (सातारा), मराठी साहित्य परिषद, बार्शी शाखा या साहित्य संस्थांचे राज्यस्तरीय उत्कृष्ट कथासंग्रह पुरस्कार मिळाले आहेत. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या




बच्चेकंपनी, आपल्याला जायचंय एका अनोख्या सफरीला. आणि आपल्याबरोबर आहेत प्रख्यात खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर. आपली सूर्यमाला, आकाशगंगा, ग्रह-तारे आणि हे अफाट पसरलेलं विश्व... अशा कितीतरी अचाट गोष्टी या सफरीत पाहायला मिळतील तुम्हाला. मग वाट कसली पाहताय?

**चला जाऊ अवकाश-सफरीला**

डॉ. जयंत नारळीकर

अनु. : डॉ. पुष्पा खरे

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ १८०/- । (ट.ख. ₹ ५०)

मराठी एमए भाग-१च्या अभ्यासक्रमात 'मिरॅकल'ची निवड झाली आहे. या सर्व बाबी माझ्यासाठी व राजहंस प्रकाशनासाठी निश्चितच अभिमानास्पद आहेत.

पुस्तकाविषयी वाचकांच्या असंख्य प्रतिक्रिया आल्या आहेत. त्यांपैकी दोन प्रतिक्रिया बोलक्या आहेत. संत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील रसायनशास्त्राचे प्रोफेसर व विभागप्रमुख डॉ. नंदकिशोर करडे यांनी अशी प्रतिक्रिया दिली की, 'माझ्या मराठीच्या प्राध्यापक मित्राने मला आपले 'मिरॅकल' पुस्तक वाचण्यास दिले. त्या दिवशी रात्री मी ते सहज वाचण्यासाठी घेतले आणि ते पूर्ण वाचून झाल्याशिवाय खाली ठेवलेच नाही. पहाटेचे चार कधी वाजले हे मला समजले नाही.'

पंढरपूर येथील सुवर्णा कुलकर्णी यांचे अपेंडिक्सचे ऑपरेशन झाले होते. पोटातील वेदनांमुळे त्यांना झोप येत नव्हती. त्या वेळी त्यांचे पती राहुल कुलकर्णी यांनी त्यांना 'मिरॅकल' वाचण्यास दिले. नंतर एका समारंभात श्री. व सौ. कुलकर्णी यांची माझी प्रत्यक्ष भेट झाली, त्या वेळी वहिनी म्हणाल्या, ''तुमचे पुस्तक मी वाचण्यास सुरुवात केली आणि मला माझ्या वेदनांचा विसर पडला. पुस्तक वाचल्यानंतरही ते हातातून सोडावेसे वाटत नव्हते.''



अशा प्रतिक्रियांमुळे मला लेखनाची नवी ऊर्जा मिळत आहे आणि मी एका नवीन विज्ञान कादंबरीचे लेखन करतो आहे. ती कादंबरी अर्थातच राजहंस प्रकाशनातर्फे प्रकाशित व्हावी अशी सुप्त इच्छा आहे, कारण राजहंस प्रकाशन हा लेखकांचा परीसस्पर्श आहे.

***डॉ. सुनील विभुते***
९०२८८५२०५७

आजच्या विज्ञानाच्या पायावर भविष्यातील
विज्ञानकल्पनेचा महाल उभारणाऱ्या -
मानवी भावभावनांचा, परस्परसंबंधांचा
वेध घेणाऱ्या - उत्कंठावर्धक, चित्तथरारक अन्
रंजक विज्ञानकथांचं सप्तरंगी इंद्रधनुष्य!

मिरॅकल

डॉ. सुनील विभुते

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)



## खास छोट्या दोस्तांसाठी सुट्टीतील 'राजहंसी' खजिना




त्यानं मातीतून रंग शोधले... शेंगदाणा-रताळ्यापासून
चिकन-शाई-कॉफी-साबण-कागद बनवले...
सोयाबीनपासून मोटारींसाठी सुटे भाग घडवले...
असा हा मुलखावेगळा कार्व्हर
या पुस्तकातून तुम्हांला भेटेल.

### किमयागार कार्व्हर

वीणा गवाणकर । चित्रे : माधुरी पुरंदरे

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ १५०/- । (ट.ख. ₹ ५०)

खास छोट्या दोस्तांसाठीचा हा बालकथासंग्रह...
मुलांच्या भावविश्वात घेऊन जाणाऱ्या, आनंदासोबतच
नकळत मूल्यसंवर्धन करणाऱ्या त्यांच्याच भाषेत
अवतरलेल्या या सुंदर बालकथा...

### छोट्यांचा मोठा प्लॅन
आणि इतर गोष्टी

मुग्धा शेवाळकर

किंमत : ₹ ७०/- । (ट.ख. ₹ ५०)







उत्साह देणाऱ्या दिवसाला पाहून अंधाराला काय वाटतं?
वर्षानुवर्षं एकाच जागी साचलेल्या तळ्याचं आयुष्य
कसं आहे? जंगलं कमी झाल्यामुळे घर हरवलेल्या
प्राण्यांना काय वाटतं? पशू-पक्षी संपावर गेले
तर काय होईल? या कविता वाचून अशा प्रश्नांची
काय उत्तरं मिळतायत पाहू या-

### प्रेम करू या पृथ्वीवर

वर्षा गजेंद्रगडकर

किंमत : ₹ १२०/- । (ट.ख. ₹ ५०)

# आठवणींचा पारिजात

## प्रॉम्प्टर

*नाटक म्हटले की प्रेक्षकांचे पहिले प्रेम नटनटींवर असते!*
*आणि नटनटींचे पहिले प्रेम..?*
*प्रॉम्प्टरवर असते!*

जागतिक रंगभूमीच्या इतिहासाची आणि बखरींची कोणीही साक्ष काढली तर प्रॉम्प्टर नावाच्या एका अतिमहत्त्वाच्या 'पात्रा'ची नोंद पानोपानी झालेली आपल्याला आढळेल. नाटकाच्या पडद्याआड आणि विंगांच्याआड आडमुठ्या अन् अंधाऱ्या जागेत तासन्तास बसून म्हणा, उभे राहून म्हणा, पण कसेही करून, या पात्राने नटनटींची जी सालोसाल स्मरणीय सेवा केली आहे, ती अजोड म्हणता येईल अशी आहे. नटनटी त्यांनी पाठ केलेले संवाद रंगमंचावर म्हणत असताना अचानक, तसे काहीही कारण नसताना केव्हाकेव्हा विसरतात, तेव्हा प्रॉम्प्टर त्यांच्या मदतीला धावून येतो. नटनटींच्या बरोबरीने तोही प्रत्येक शब्द डोळ्यांत तेल घालून स्वत:शी पुटपुटत असतो, त्यामुळे नटनटींना क्षणार्धात तो रसद पुरवतो! फजिती होण्याची वेळ केवळ प्रॉम्प्टरमुळे वाचते! पण नाट्यप्रयोग संपला की आनंदाने नाचणारे नटनटी प्रॉम्प्टरला विसरलेले असतात. पण अशा या प्रॉम्प्टरनेही अनेकदा अभावितपणे रंगमंचावर भूमिका केल्या आहेत. रंगभूमीच्या इतिहासाच्या काही पानांमधील प्रॉम्प्टरच्या भूमिकांची ही काही पाने :

स्थळ : दिवाणखाना. प्रेक्षकांच्या दिशेला तोंड करून काकासाहेब एका गुबगुबीत सोफ्यावर बसले आहेत. कुठलेसे वर्तमानपत्र वाचताहेत. हातातली रॅकेट उडवीत लिली सोफ्याच्या मागच्या बाजूने धावत येते. धावपळीत तिचा पाय सोफ्यावर ठेचकाळल्याचे लक्षात येताच ती संकोचाने जीभ चावते आणि तिथेच सोफ्यामागे वाकून नमस्कारही करते. सोफ्यामागे प्रॉम्प्टर लपल्याचे लक्षात येऊन प्रेक्षक खो खो हसताहेत तोच सोफ्यामागे तोपर्यंत पाय अवघडून बसलेला प्रॉम्प्टर कसाबसा उठतो आणि खजील होऊन, लिलीला वाकून नमस्कार करून पुन्हा सोफ्यामागे प्रॉम्प्टरच्या भूमिकेत बसून आपले काम सुरू करतो...

एका हौशी संस्थेचे नाटक. नाटक विनोदी होते. सगळ्या हौशी मंडळींनी आपापली

भाषणे अगदी तोंडपाठ केली होती. तरीपण सावधगिरी म्हणून एका प्रॉम्प्टरची नेमणूक केली होती. तो तरुण तसा नवखा होता. त्याला नाटकात काम करायचे नव्हतेच. पण सगळ्यांबरोबर असावे म्हणून त्याने ते प्रॉम्प्टरचे काम स्वत:कडे मागूनच घेतले होते. नाटकाच्या तालमी सुरू झाल्या. त्या सुरू असताना हा प्रॉम्प्टर गालातल्या गालात हसत असायचा. नाटक होतेच तसे विनोदी. खूप दिवस नाटकाच्या तालमी केल्यामुळे सगळ्यांची भाषणे अगदी तोंडपाठ झाली होती. हा प्रॉम्प्टर खुशीत होता! प्रॉम्पटिंग असे काही त्याला करावेच लागायचे नाही. तरीपण सावधगिरी म्हणून त्याने पुस्तकात एकसारखे पाहत राहिले पाहिजे असे सगळ्यांनी त्याला बजावले होते. नाट्यप्रयोगाच्या दिवशी हौशी प्रेक्षक मोठ्या संख्येने नाटक पाहायला आले होते. नाटक सुरू झाल्यापासून हशा-टाळ्यांनी खूपच धमाल केली. हा प्रॉम्प्टर तर नाटकाशी अगदी समरसून गेला होता. विंगेत उभा राहून, तल्लीन होऊन पात्रांना प्रोत्साहन देत होता. पण नाटकाचे पुस्तक मात्र तसेच हातात ठेऊन तो हशा-टाळ्यांचा मनसोक्त आनंद घेत होता. थोड्या वेळाने नाटकातले काकासाहेब एका तरुणाला म्हणाले, ''या ना, या. या! काही चहा वगैरे घेणार?..'' या वाक्याबरोबर प्रेक्षकात एकच हशा उसळला! - नाटकामध्ये तल्लीन झालेला प्रॉम्प्टर विंगेतून एकेक पाऊल पुढे सरकत सरकत थेट रंगमंचावर पात्रांच्या समोर आला होता!

❖

नेपोलिअन बोनापार्ट हा फ्रान्सचा सम्राट! त्याच्या चरित्रावर अनेक नाटके लिहिली गेली आहेत. अनेक नटांनी नेपोलिअनची भूमिका आत्तापर्यंत केली आहे. असाच एक प्रयोग होता आणि नेपोलिअनची भूमिका एक नट करत होता.





चाळिशीतील जोडप्याचा वैचारिक विसंवाद.
स्त्री-पुरुष लग्नसंबंधातील सार्थकता आणि
निरर्थकता, जगण्यातील अपरिहार्यता,
लांबलेला आत्महत्येचा प्रवास.
सध्याच्या जगण्यावर भाष्य करीत
जाणारे नाटक

पुनश्च हनिमून

संदेश कुलकर्णी

किंमत : ₹ १७५/- । (ट.ख. ₹ ५०)

नाटकाचा प्रयोग जाहीर झाला, तिकीटविक्री सुरू झाली. पण नाटकाला तीनएक दिवस राहिले असताना नेपोलिअनची भूमिका करणारा नट अचानक आजारी पडला. - काय करावे? प्रयोग ऐनवेळी रद्द करता येणार नव्हता. चर्चा सुरू राहिल्या, आणि असे ठरले की दुसऱ्या एका नटाने नेपोलिअनची भूमिका करायची. त्याही नटाची त्याला हरकत नव्हती. पण खूप वर्षांत आपण नेपोलिअन केलेला नसल्यामुळे आपल्याला एका प्रॉम्प्टरची गरज भासणार असल्याचे त्याने स्पष्ट केले. त्या नटाची आणि प्रॉम्प्टरची गाठभेट झाली, तेव्हा प्रॉम्प्टरने सुचविले की नेपोलिअनने स्वत:बरोबर एक तपकिरीची डबी बाळगावी. आपण वाक्य बोलण्याच्या वेळी चाचपडणार आहोत असे वाटले की नेपोलिअनने तपकिरीच्या डबीवर हलकेच टिक-टिक करावे आणि प्रॉम्प्टरला इशारा द्यावा. ही योजना अतिशय यशस्वी ठरली. तपकिरीच्या डबीचा वेळोवेळी आधार घेत नटाने आणि अर्थातच प्रॉम्प्टरने नाट्यप्रयोग व्यवस्थित निभावला. प्रयोग उत्तम झाला आणि प्रेक्षक व समीक्षकांनी नटाचे कौतुक केले!

आणि तपकिरीची लकब पुढे इतकी लोकप्रिय ठरली की त्यानंतर नेपोलिअन म्हणजे तपकिरीची डबी असे समीकरणच ठरून गेले.

आज इतिहासकार म्हणतात की नेपोलिअन बोनापार्ट तपकीर ओढत असे.

कोणता इतिहास खरा? - एका चतुर प्रॉम्प्टरने घडविलेला?

**माधव वझे**
९६०४८४८०३३

साठोत्तर प्रायोगिक (समांतर) मराठी रंगभूमीचे
केवळ साक्षी नव्हे, तर निरनिराळ्या नात्यांनी
प्रत्यक्ष सहभागी असलेले प्रतिभावान रंगकर्मी
माधव वझे यांनी अनेक संदर्भबिंदूंच्या मदतीने घेतलेला
पाश्चात्त्य आणि मराठी रंगभूमीचा
अभ्यासपूर्ण वेध.

समांतर रंगभूमी :
पल्याड-अल्याड

माधव वझे

किंमत : ₹ २९०/- । (ट.ख. ₹ ५०)



## ‘राजहंसी’ कवितादालन



निवडुंगातून फूल यावे, तसे कवीच्या
काटेरी अनुभवाला आलेले करुणेचे फूल
या कवितांना साद घालते. कवीची भाषा करुणेचा
स्वर लाभलेली सत्याची भाषा आहे.

### व्याकुळ पिंपळ

हिमांशु कुलकर्णी

किंमत : ₹ १२०/- । (ट.ख. ₹ ५०)



कवितेवर प्रेम करणाऱ्या एका कविमनाचा कवितेसोबतचाच
हा भावविभोर करणारा, तर कधी अंतर्मुख करणारा प्रवास.
‘माझी कविता माझ्यासाठी’ असं म्हणणाऱ्या
या मनस्वी कवीची कविता वाचता-वाचता कधी
आपली होऊन जाते हा अनुभव घ्यायलाच हवा!

### दत्तप्रसाद दाभोळकरांच्या कविता

दत्तप्रसाद दाभोळकर

किंमत : ₹ १५०/- । (ट.ख. ₹ ५०)



युद्धाची पद्धत बदलली. शस्त्रं बदलली.
पण माणसं मारली जातच आहेत!
त्यांच्या रोज शेकड्यांनी बातम्या येतच आहेत.
युद्धानंतर नेमकं काय पसरून राहतं?
याचा कवितांतून घेतलेला वेध -

### युद्धानंतर...

आदित्य दवणे

किंमत : ₹ १८०/- । (ट.ख. ₹ ५०)

# क... कवितेचा

मराठी मनाच्या सर्जनशीलतेला
पाऊलवाट देणारे सदर

## विश्व माझे

मी कधी म्हणले तुला दे बाग बहराचा मला
सानुलेसे विश्व माझे स्वप्न संचय सानुला

मी महाली राहण्याचे स्वप्न कधी ना देखिले
चिमुकले घरकुल माझे नित्य हृदयी रेखिले
चंदनाच्या उंबऱ्याला स्वस्तिपद्मांचा लळा
मी कधी म्हणले तुला...

माझिया पंखांस नव्हती गगनस्पर्शी कामना
वाट रुळलेली धरावी हीच मनीची भावना
गजबजे भवताल माझा हा सुखाचा सोहळा
मी कधी म्हणले तुला...

पश्चिमेची झुळुक येता तुळस हलके डोलते
सुख कुणाचे झेलते ती दु:ख हलके पेलते
तुळस होते मी कधी अन् तुळसही भेटे मला
मी कधी म्हणले तुला...

द्यायचे असले तुला तर प्रेम दे मनमोहना
अंतरंगा उजळणाऱ्या फुलव हृदयी भावना
लौकिकाला स्पर्शणारा दे जिव्हाळा तू मला
मी कधी म्हणले तुला...

***मृणालिनी कानिटकर जोशी***
९९६०३९२९२३

# 'राजहंसी' विविधा




शिष्य, मैफलगायक, संगीतकार आणि गुरू
ही त्यांची संगीतविश्वातील चार रूपं.
यात अव्वल असण्याची त्यांची आंतरिक ऊर्मी!
यातून खूप काही घडत गेलं. या प्रवासाचा वेध

## अभिषेकी

पं. जितेंद्र अभिषेकी : कला आणि जीवनप्रवास

शैला मुकुंद

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ५००/- । (ट.ख. ₹ ५०)



आजच्या तरुण पिढीला वृद्धसंगोपनाकडे केवळ
भावनिक आणि मानवतावादी दृष्टिकोनातून नाही,
तर आर्थिक दृष्टिकोनातून बघण्याची गरज आहे.
कसे, ते समजावून सांगणारे आगळेवेगळे पुस्तक...

## सांजवात

प्राजक्ता पाडगांवकर

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)




आजच्या धकाधकीच्या जीवनात मनाला शांतता आणि
समाधान मिळवून देणारं, कृष्णाच्या दैवी रूपापल्याड नेऊन
त्याची कालातीत शिकवण देणारं आणि
प्राचीन परंपरा-वाङ्मयाबद्दल डोळसपण जागवणारं
हे संवादात्मक शैलीतील वैशिष्ट्यपूर्ण प्रवासवर्णन.

## नंदीघोष-यात्रा

श्रीकृष्णकथा : वेध नवा

सतीश मुटाटकर, यशवंत मराठे
अनु. डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)

# उद्‌गार

## नियतकालिकांचे / समाजमाध्यमांचे अभिप्राय

## सायबर ॲटॅक

*सायबर गुन्ह्यांच्या पसाऱ्याकडे एक अर्थव्यवस्था म्हणून पाहिलं, तर हे गुन्हेगारीविश्व हे जगातील तिसरी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था मानली जाईल. सायबर गुन्ह्यांमुळे २०२४मध्ये जगभरात लाखो कोटींपेक्षा जास्त नुकसान होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर डॉ. संजय तुंगार आणि सुधीर साबळे लिखित 'सायबर ॲटॅक' या पुस्तकाचं महत्त्व अधोरेखित होतं.*

माणसाच्या जगण्यात आमूलाग्र बदल घडवून आणणाऱ्या सायबर क्रांतीमुळे जग अधिक स्मार्ट, अधिक तरतरीत आणि तल्लख झालं असलं, तरी या सायबर नाण्याच्या दुसऱ्या घातक बाजूच्या परिणामांच्या आगीत जग वरचेवर होरपळून निघताना दिसतं.

सायबरविश्वातील गुन्ह्यांची व्याप्ती किती मोठी आहे, हे जागतिक आर्थिक मंचाच्या २०२३च्या जागतिक आर्थिक जोखीम अहवालात पाहायला मिळतं. सायबर गुन्हेगारीला आज आणि पुढील दहा वर्षांसाठी जगासमोर असलेल्या पहिल्या दहा मोठ्या जोखमींपैकी एक म्हणून या अहवालात स्थान देण्यात आलं आहे. जर सायबर गुन्ह्यांच्या पसाऱ्याकडे एक अर्थव्यवस्था म्हणून पाहिलं, तर सायबर गुन्हेगारीविश्व हे जगातील तिसरी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था मानली जाईल; असं हा अहवाल सांगतो! यात दिलेल्या आकडेवारीनुसार, सायबर गुन्ह्यांमुळे २०२४मध्ये जगभरात लाखो कोटींपेक्षा जास्त नुकसान होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर राजहंस प्रकाशनानं प्रसिद्ध केलेल्या डॉ. संजय तुंगार आणि सुधीर साबळे लिखित 'सायबर ॲटॅक' या पुस्तकाचं महत्त्व अधोरेखित होतं. या पुस्तकात नमूद केल्याप्रमाणे वैयक्तिक पातळीवर अशिक्षित, सुशिक्षित, मुलं, मुली, वृद्ध, मध्यमवयीन यांतील प्रत्येक जण रोज कोणत्या ना कोणत्या सायबर गुन्ह्यांना बळी पडत असतातच; पण याउपर मोठमोठ्या कंपन्या, संस्था आणि कधी कधी चक्क देशांची सरकारंदेखील सायबर गुन्हेगारीला बळी पडल्याची उदाहरणं आहेत. भारतात

दरवर्षी लाखो सायबर गुन्हे घडतात. 'सायबर ॲटॅक'मध्ये म्हटल्याप्रमाणे, या गुन्ह्यांचे बळी ठरण्याच्या कारणांमध्ये सर्वांत महत्त्वाचं कारण सायबर निरक्षरता असलं, तरी अनेकदा यामागे आपली फसगत कोणाला सांगण्याची लाज वाटणं, या गुन्ह्यांच्या प्रकरणात गुन्हेगारांकडून आणल्या गेलेल्या दडपणामुळे गुन्हा नोंदवण्यात दिरंगाई होणं; हनी ट्रॅप, सेक्शुअल एक्सप्लॉयटेशन यात अडकल्यानं येणारं ओशाळवाणेपण अशी कारणंही असतात. सायबर गुन्हा दाखल करण्यात झालेल्या दिरंगाईमुळे एका वर्षात भारतात सायबर गुन्ह्यांना बळी पडलेल्या वीस लाखांपैकी फक्त सव्वा लाख लोकांना पैसे परत मिळाले, असं या पुस्तकात म्हटलं आहे.

सायबरविश्वाचे अपरिहार्यपणे नागरिक झालेल्या आपल्या सर्वांचं हे पुस्तक एखाद्या सुरक्षाकवचासारखे संरक्षण करू शकेल यात शंका नाही. सायबर गुन्हेगारीतील प्रकार विविध कथांच्या माध्यमातून सोप्या भाषेत लेखकांनी या पुस्तकात सांगितले आहेत. संगणकीय फसवणूक, आर्थिक गुन्हे-घोटाळे, सायबर सेक्स तस्करी, जाहिरात-फसवणूक, सायबर-दहशतवाद या प्रमुख गुन्ह्यांखेरीज इतर अनेक प्रकारच्या सायबर गुन्ह्यांच्या कथांचा यात समावेश आहे. प्रत्येक कथेत येणाऱ्या पात्रांची सायबर फसगत कशी होते याचं वर्णन करून हे टाळण्यासाठी काय करता येतं याची सुस्पष्ट माहिती कथांच्या शेवटी सांगितली आहे.

हे पुस्तक वाचून होईतो आपण पूर्णपणे सायबर-साक्षर झालो नाही, तरी कोणत्याही सायबर गुन्ह्याला सहजासहजी बळी पडणार नाही इतके सायबर स्मार्ट नक्की होतो.

**डॉ. चंद्रशेखर फणसळकर**

*(लोकसत्ता, 'लोकरंग' पुरवणी,* ५ जानेवारी २०२५मधून साभार)





लोन फ्रॉड, एटीएम क्लोन, ऑनलाइन गेमिंग, घसघशीत उत्पन्नाची लालूच दाखवणारे प्रीपेड टास्क, फिशिंग... एक ना दोन, अनेक प्रकारच्या फसवणुकी. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मोहक मुखवट्याआडचा भेसूर चेहरा दाखवणारे- सायबर गुन्ह्यांबाबत सर्वांना सतर्क बनवणारे -

## सायबर ॲटॅक

डॉ. संजय तुंगार । सुधीर साबळे

किंमत : ₹ २९०/- । (ट.ख. ₹ ५०)

## ।। श्रद्धांजली ।।

*ग्रंथ आणि चित्रपट यांची आस्वादक समीक्षा करणारे, 'माणूस' साप्ताहिकापासून सातत्याने लेखन करणारे साहित्यिक अशोक प्रभाकर डांगे यांचे दि. १५ एप्रिल, २०२५ रोजी दुःखद निधन झाले. 'राजहंस प्रकाशन' परिवारातर्फे अशोक डांगे यांना आदरांजली!*

*'परिशिष्ट' ('मसाप'चा उत्कृष्ट कादंबरी पुरस्कार, १९९४), 'टच आणि इतर चित्रकथा', 'लंगडी आजी आणि रावण मामा', 'पालट' ही अशोक डांगे यांची ग्रंथसंपदा राजहंस प्रकाशनकडून प्रकाशित झाली आहे.*

*अशोक डांगे यांच्याशी दीर्घकाळ स्नेह आणि संवाद असणारे अनिल किणीकर यांचा श्रद्धांजलीपर लेख येथे प्रकाशित करत आहोत.*

*त्यासोबतच त्यांच्या 'लंगडी आजी आणि रावण मामा' या पुस्तकाची संहिता वाचल्यानंतर दिलीप माजगावकर यांनी त्यांना पत्र लिहिले होते. पुढे याच पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा 'राज्य पुरस्कार' प्राप्त झाला. या पुस्तकासंदर्भातील पत्र म्हणजे प्रकाशक आणि लेखक यांच्यातील हार्दिक संगतीचा उत्तम नमुना आहे. डांगे यांचे अनेक स्वभावविशेष त्यातून जाणवतात, म्हणून ते पत्र येथे देत आहोत.*

---

# चौकटीत जगणारा शेजारी, मित्र आणि लेखकही!

५ सप्टेंबर १८७८ रोजी रॉय किणीकर यांचे निधन झाले. त्यानंतरच्या 'माणूस' साप्ताहिकात अशोक प्रभाकर डांगे याने त्यांच्यावरील लेखात म्हटले होते, 'रॉय किणीकर हा माणूस मुळातच चौकटी मांडणारा माणूस नव्हता, तर मांडलेल्या चौकटी मोडणारा माणूस होता...'



अशोक प्रभाकर डांगे हा आयुष्याच्या चौकटीतच राहणारा आणि जगणारा शेजारी होता, मित्र होता.

अशोकच्या घरी त्याला 'मोहन' म्हणायचे. मीही त्याला मोहनच म्हणायचो. तो तसा आमच्या घरचाही होता. तो काळ तसा मध्यमवर्गीय आणि 'सदाशिव पेठी' संस्कृतीचा होता, तसेच वाडा वातावरणाचाही होता. वाडा

म्हणजे एक मालक आणि अनेक भाडेकरू. मी आणि मोहन भाडेकरू होतो. सदाशिव पेठेतील टिळक रोड, एसपी कॉलेज आणि त्या वेळच्या जीवन हॉटेलशेजारील एका गल्लीत असलेल्या वाड्यात मोहन आणि आम्ही तिसऱ्या मजल्यावरील दोन-दोन खोल्यांत भाडेकरू म्हणून राहत होतो. दोघांच्याही घरचे नातेसंबंध अनौपचारिक होते. मुख्यत: आमच्या अडीअडचणीला डांगे कुटुंब नेहमी मदत करायचे.

मोहनची आई सुमती. सर्व जण त्यांना 'वहिनी' म्हणायचे. वडील प्रभाकर, त्यांना 'दादा' म्हणत होतो. मलाही घरी आणि मोहनही 'दादा' म्हणत असत. आमच्या दोघांत चार-पाच वर्षांचं अंतर असावे. मोहन सिव्हिल इंजिनीयरिंग करत होता. मी नोकरी करून बीए करत होतो. एके दिवशी जिना उतरत असताना त्याने मला दोन-तीन कागद दिले आणि म्हणाला, ''वाचून बघ. आपण बोलू या.'' ते कागद मी माझ्या वहीत ठेवले आणि काही बोलत बोलत दोघे आपापल्या मार्गाने निघून गेलो. साधारण १९६७-६८ची ही गोष्ट असावी. नंतर मोहनने दिलेले ते दोन-तीन कागद मी वाचले. त्या तीन-चार कविता होत्या. अगदी वेगळ्याच अशा होत्या. समर्पक शब्द आणि स्वत:ची शैली.

त्या कवितांवर आम्ही दोघे बोललो आणि मी त्याला सांगितलं की, ''जेव्हा जेव्हा लिहिशील, तेव्हा मला वाचायला दे.'' हे आमचे कॉलेजचे दिवस होते. मी त्या वेळी 'माणूस', 'साधना', 'सोबत' या काही साप्ताहिकांत आणि रविवार 'तरुण भारत'मध्ये थोडेफार लिहीत होतो आणि ते 'छापून' यायचे. त्यामुळे मोहन मला त्याने लिहिलेले वाचायला देत होता.

मी १९६९-७१ या काळात 'श्रीशब्द' नावाचे अनियतकालिक काढत होतो. 'श्रीशब्द'च्या एकवीस अंकांपैकी साधारण पंधरा अंकांत मोहनच्या कविता किंवा कथा असायच्या.

एके दिवशी मी 'माणूस'च्या दिलीप माजगावकरांशी मोहनची ओळख करून दिली. नंतर तो 'माणूस'मध्येही लिहू लागला. त्यामध्ये काही भारतीय आणि पाश्चात्त्य चित्रपटांवर त्याने बरेच लिहिले. त्या लेखांचेही 'टच-१' व 'टच-२' असे संग्रह 'राजहंस'ने प्रकाशित केले.

मोहनचे लेखन मोजक्या शब्दांत, गंभीर शैलीत होते. तसा तो स्वभावानेही होता. म्हणजे मोजके बोलणारा, शांत - कोणते तरी दु:ख असावे, म्हणून - गंभीरपणे बोलणारा होता. क्वचितच हास्यविनोद, चावट वगैरे हे तर अजिबातच नाही. खरे तर त्यांच्या घरचे वातावरण मोकळेपणाचे होते. तरीही मोहन मात्र एक 'तत्त्वज्ञ' वाटत असे. म्हणजे तो होताही तसाच, विचार आणि चिंतन करणारा. हे गुण त्याच्या स्वभावाप्रमाणेच लेखनही होते.

मोहनचा स्वभाव जरी अबोल असला, तरी चर्चा मात्र मोकळेपणाने करायचा.

मोहनचे राहणे नीटनेटके होते. वागणेही तसेच. अगदी वडिलांप्रमाणे, शाळा-कॉलेज, नोकरी सर्व काही चारचौघांसारखेच केले. एकच नोकरी निवृत्त होईपर्यंत प्रामाणिकपणे केली. सकाळी नेहमीप्रमाणे खांद्यावर बॅग अडकवून ऑफिसला जाणार, संध्याकाळी नेहमीच्या वेळी घरी परत येणार. जेवण म्हणजे घरचा डबा. मी चौदा वर्षे नोकरी करून सोडली. नोकरीनंतर दिलीप माजगावकरांमुळे माझ्या आयुष्याला एक वेगळे वळण मिळाले. त्यांच्यामुळे मला एक व्यवसाय करण्याची संधी मिळाली. अडचणीच्या काळात ते तन-मनाने माझ्यासाठी खंबीरपणे उभे राहिले. नवीन तंत्रज्ञान आणि स्पर्धा यांमुळे मी तो व्यवसाय बारा वर्षांनंतर बंद केला. त्यानंतरही दिलीपरावांनी मला एक संधी दिली. पण मी त्यांची अपेक्षा पूर्ण करू शकलो नाही.

पुन्हा एकदा मी स्वतंत्रपणे काम केले. काही वर्षे नोकरीच म्हणा, करून मी त्यातून बाहेर पडलो. आता माझा मी!

दिलीपरावांचे आणि माझे काही ऋणानुबंध असावेत. संध्याकाळी कधीकधी आम्ही तीन-चार मित्र कटिंग चहा पीत जीवन हॉटेलमध्ये बसायचो, गप्पा-टप्पा चालायच्या. मोहनला तसे कोणतेही व्यसन नव्हते - अगदी निर्व्यसनी. व्यसन होते ते गंभीर वाचनाचे. नोकरी सांभाळून जेवढे वाचन-लेखन होईल तेवढेच. पुण्याला फिल्म अर्काइव्हमध्ये निवडक भारतीय आणि पाश्चात्त्य चित्रपट पाहायला मात्र शनिवारी संध्याकाळी आम्ही नियमित जात होतो. कोकणातील देवगडमध्ये त्यांच्या आंब्याच्या बागा होत्या. मोसमात तिथे जाऊन आंब्याच्या पेट्या आणायचा.

एकदा तो मला सहज म्हणाला होता, ''दादा, खरं तर मला मराठी आणि तत्त्वज्ञान हे विषय घेऊन बीए, एमए करायचं होतं. पण का कुणास ठाऊक, मला बीई सिव्हिल करावं लागलं.''

तसे जर झाले असते, तर मोहन एमए होऊन चांगला प्राध्यापक झाला असता, त्याला पीएच.डी.ही करता आली असती. विषय आणि व्यासंग त्याच्या रक्तातच होता. परिणामी मोहनने खूप चांगले लेखन केले असते. कथा, कविता किंवा कादंबरीही लिहिण्याची त्याची प्रतिभा होती. तशी त्याची पाच-सहा पुस्तकेही प्रसिद्ध झाली होती. त्यात दोन कादंबऱ्या होत्या. पण यापेक्षा अधिक, कसदार लेखन झाले असते. मराठीतील एक नामवंत लेखक होण्याची त्याची गुणवत्ता होती, पण शिक्षणामुळे नोकरी करावी लागली, ती चाकोरीतच. म्हणजे सर्व 'जगणे' रुटीनच.

एक चांगला शेजारी, मित्र आणि लेखक असा मोहन. रॉय कधीकधी

घरी असायचे. म्हणजे ते कामानिमित्त मुंबई, कोल्हापूर, बेळगाव, दिल्ली कुठेही बाहेर असायचे. माझे वडील रॉयसाहेब घरी असायचे, तेव्हा आम्ही पाच-सहा मित्र जमायचो. त्यात मोहनही असायचा. रॉय आम्हाला चित्रपट, नाटक, साहित्य यांबद्दल चौफेर सांगायचे. तेव्हा मात्र मोहन कधीकधी शंका विचारायचा. स्वत:ला काय वाटते ते बोलायचा, तेव्हा मोहन हा एक वेगळाच माणूस वाटायचा. पण हे वाटणे काही तासांपुरतेच असायचे.

मी सध्या अमेरिकेत मुलाकडे आहे. दिलीप माजगावकरांनी मला कळवले, 'डांगे गेले.' मी नि:शब्द झालो.

दहा-पंधरा दिवसांत मोहन उर्फ अशोक प्रभाकर डांगेची तब्येत खालावली. दुर्धर आजारांची गुंतागुंत झाली. त्यातून सुधारणा झाली नाही. शांत, निर्व्यसनी माणसाला असा 'अपघात' का व्हावा? हे काय प्राक्तन आहे?

आज मोहन उर्फ अशोक प्रभाकर डांगे शेजारच्या घरात नसला, तरी माझ्या मनात मात्र 'घर' करून आहे.

***अनिल किणीकर***

९४२०४५६५३४

---

कादंबरीकार श्री. डांगेमहाराज

सप्रेम नमस्कार.

तुमचं लेखन आवडलं. खूपसं आवडलं. अभिनंदन.

एक गोष्ट मान्य करतो. या लेखनाबाबत माझा अंदाज पूर्ण चुकला. तुमचा खरा ठरला. एक कारण, तुम्ही मनानं आणि आतड्यानं त्यात होतात. मी दोन्हीनं बाहेर होतो. सुरुवातीला तुम्ही कादंबरी नावाखाली पाठवलेला काही भाग वाचून निराशा झालेली होती. जोडीला 'पालट'च्या आठवणी होत्या. वाटत होतं, या विषयातून यांनी बाहेर पडावं. त्याच आसाभोवती फिरू नये. विषयाची चौकट तोडून टाकावी. एक-दोनदा मी हे स्पष्टपणे तुम्हाला सांगितलं, काही विषय सुचवून बघितले. पण नंतरच्या बोलण्यात मी याच विषयावर काम करतो म्हणालात, तेव्हा एका बाजूनं लेखनाबद्दल साशंक झालो. मनात असाही विचार येऊन गेला की, प्रकाशनाबाबत पुढे पूर्ण अंधार दिसत असतानाही जो माणूस विषय धरून राहतो, त्याचं विषयावरचं प्रेम आणि त्यातलं रुतणं आणि स्वत:च्या लेखणीवरचा विश्वास आपण समजलो त्यापेक्षा अधिक आहे. न जाणो, आपला आजवरचा अनुभव आणि अंदाज आपल्याला चकवून जाईल. त्याप्रमाणेच झालं. माझा अंदाज चुकला. लेखन माझ्या अपेक्षेबाहेर छान उतरलं.

कादंबरीच्या अंगानं न जाता व्यक्तिचित्रांच्या अंगानं जाण्याची विनया खडपेकर यांची सूचना योग्य होती.

हे लेखन वाचताना यातील काही व्यक्तिचित्रांनी मला माणदेशच्या माणसांची आठवण करून दिली. यात थोडीही अतिशयोक्ती नाही. लंगडी आजी, भिकूमामा, रावणमामा, अंत्यामामा या व्यक्तिरेखा त्या दृष्टीनं बघण्यासारख्या आहेत. एक गोष्ट तुमच्या लक्षात येईल, जिथे तुम्ही केवळ वर्णनाच्या अंगानं जाता, मग ते वर्णन निसर्गाचं असो, घरांचं असो, रस्त्याचं असो, पावसाचं असो अथवा तिथल्या माणसांचं असो, तुम्ही वाचनीय राहता. वाचनीयता आणि चित्रदर्शी शैली हे तुमच्या लेखणीचं बळ आहे, पण अशा प्रसंगात तेच दुबळं ठरतं आणि मूळ विषयाच्या केंद्रस्थानापासून वाचकाला दूर नेतं. आणि अशा जागी लेखन पसरट म्हणूनच परिणामाच्या दृष्टीनं फिकट होत जातं. अशा अनेक जागा या लेखनात आहेत. मी त्या हस्तलिखितावर दाखवलेल्या आहेत. पण ज्या जागा तुम्ही वर्णनापेक्षा प्रसंगातून उभ्या करता, त्या ठिकाणी हे लेखन एकदम जिवंत होतं आणि एका उंचीवर जातं. लंगडी आजी पैसे आणायला मुगलवाडीत जाते, हा प्रसंग बघा. अगदी थोड्या शब्दांत तो वाचकांसमोर तुम्ही हुबेहूब उभा करता. मुसलमान वस्ती, ती माणसं, त्यांच्याकडे आलेला पैसा आणि प्रसंगी व्यवहारापेक्षा माणुसकी जपणाऱ्या त्यांच्या बायका आणि कठीण प्रसंगात घरातल्या कर्त्या मुलांनी हातपाय गाळल्यावर खंबीरपणे उभी राहिलेली लंगडी आजी हे सारं फार प्रभावीपणे या लेखनात उभं राहतं. तुमची लेखणी फारशी भावविवश न होताही त्यातलं कारुण्य तुम्ही हरवत नाही. अशा निवडक प्रसंगांतून काही जागी उंची गाठणारं हे लेखन असे प्रसंग मुळातच कमी असल्यानं अनेकदा वर्णनाच्या पठारावरून सपाट जात राहतं आणि अंतिम परिणामात काही अंशी उणं पडतं.

तुमच्या खाजगी आयुष्यात तुम्हाला बोलायला आवडत नाही, हे ठीक आहे, पण तुम्ही तुमच्या पात्रांनाही अबोल का ठेवता? अनेक जागी तुमची पात्रं बोलती झाली, त्यांचे एकमेकांतले नातेसंबंध संवादातून, संघर्षातून उभे राहिले तर लेखन अधिक परिणामकारक उतरेल, असं मला वाटतं. उदाहरण द्यायचं तर, कसऱ्या गाईचा आणि नानाआजोबांचा मृत्यू हे प्रसंग तुम्ही नेमक्या शब्दांतून छान रंगवले आहेत; पण भिकूमामा आणि मामी यांचे संबंध केवळ वर्णनातूनच आल्यानं आणि ती पाल्हाळिक झाल्यानं अंतिम परिणाम हरवून बसतात. भिकूमामाचं राजकारणात रस घेणं ही एक वेगळी बाजू तुम्ही समोर आणता, पण आठ-दहा ओळींतच ती आवरता. त्यामुळे स्वभावातल्या त्याच्या त्या अंगाचं पुरेसं दर्शन त्यात येत नाही. 'नेहरूंना देशाच्या आपल्या इस्टेटीत सुभाषचंद्र वाटा मागतील' अशी भीती

वाटत होती, अशा वाक्यातून कोकणी माणसं राजकारणाकडे आणि त्या वेळच्या नेत्यांकडे कशा बेरक्या दृष्टीनं पाहत होती, हे तुम्ही फार मार्मिकपणे दाखवता, पण पुढे हा विषय एकदम आवरता घेता.

दुसरी अशीच जागा कृष्णामामाच्या व्यक्तिरेखेची. रावणमामाच्या तुलनेत ही व्यक्तिरेखा फार सपाट झाली आहे. मुळात त्याच्या व्यक्तिमत्त्वाला कंगोरे कमी म्हणून असं झालंय का, याचाही विचार करा. तीच गोष्ट अंत्यामामाची. हे प्रकरण फार छान उतरलंय यात शंका नाही, पण त्यातला पिंडदान आणि कावळा शिवणं हे प्रसंग फार लांबल्यानं हा भाग कंटाळवाणा आणि पुढे पुढे तर विनोदी अंगानं जातो. भले कोकणी माणसांच्या स्वभावामुळे ते विनोदी होऊ शकतील, पण तुमच्या प्रकृतीला ते मानवत नाही आणि एकूण लेखनाचा बाज तिथे बिघडून जातो. लीलावती आणि परबमामा या दोन्ही व्यक्तिरेखा, तुम्ही चित्रपट कथेच्या अंगानं रंगवता. त्यांच्यातलं नाट्य तुम्ही सुरेख पकडता. त्या अत्यंत वाचनीय आहेत, यात शंका नाही. पण इथे लेखणी नाट्यपूर्णता दाखवण्याच्या नादात अधिक वेग पकडते. त्यामुळे तुम्ही त्या व्यक्तिरेखेत पुरेसं खोल उतरत नाही, असंही वाटत राहतं. तरीही पुनर्लेखनात त्यांना धक्का लावू नका, आता कदाचित त्याची लय बिघडेल. असो.

मी पत्र लिहितोय, परीक्षण नाही, याचं माझं भान केव्हाच सुटलंय. पण इलाज नाही, कारण या लेखनातून अनपेक्षितपणे तुम्ही मला सुखद धक्का दिलात. काही ठिकाणी : 'च्यार पानं घेताय गं लंगड्याबामणे', किंवा एका मुलीच्या काळेपणाचं वर्णन करताना 'अवसेच्या अंधारात न्होकून जाईल वरल्या घरातली पोर', अशासारखी कोकणी भाषा तुम्ही फार छान वापरली आहे, पण अशा जागा लेखनात सहजपणे वाढल्या, तर मजा येईल.

आता जाता जाता, अखेरच्या उपसंहाराबाबत. अशा स्वरूपाच्या लेखनाला उपसंहार असावा / नसावा याविषयी दुमत होऊ शकेल. व्यक्तिश: मला तो आवश्यक वाटत नाही, पण याबाबत तुम्ही आणि विनया योग्य तो निर्णय घ्या. उपसंहार येणार असेल, तर तो आहे यापेक्षा अधिक गंभीर, विचारशील असावा, असं मात्र वाटतं. लेखनातल्या सगळ्या माणसांकडे तुम्ही आज कसं बघता, ती भेटली तर तुमच्या त्यांच्याविषयी प्रतिक्रिया काय राहतील, याविषयी लिहा. ही माणसं अशी का घडली. त्यांच्या घडणीत कोकण परिसर, त्याची भौगोलिकता, तिथला निसर्ग, तिथला पाऊस आणि तरीही ओसाड शेतीवाडी, उद्योगधंद्याचा अभाव, त्यामुळे हातांपायांना काम नसणं, त्यातून आलेलं रिकामपण, भकासपण आणि पिढ्यान्‌पिढ्यांचं दारिद्रय, वर्षानुवर्षाच्या श्रद्धा-अंधश्रद्धा, त्यातून घडत गेलेले त्यांचे स्वभाव, त्यांचं भाबडेपण, बेरकीपण,

सावधपण या सर्वांचा काही शोध घेता येतो का, याचा विचार करा. हे तुम्ही करू शकाल, असा मला विश्वास वाटतो, कारण याविषयी तुम्ही अनेकदा माझ्याशी विश्लेषणात्मक सुरेख बोलला आहात.

काही भागावर तुम्ही पुन्हा काम करणार आहात, त्या वेळी या सर्व गोष्टींचा विचार करा आणि तुम्हांला योग्य वाटतील-पटतील तेवढेच बदल करा. अखेर हे तुमचं अपत्य आहे. त्याला कुठे तीट लावायची किंवा बाळाच्या पायांत वाळे घालायचे का नाही, हा निर्णय तुमचा.

पण समाधान वाटावं, असं लेखन तुमच्या हातून झालं याचा मला आनंद आहे. कदाचित हीच आनंदाची ऊर्जा तुम्हांला पुढच्या कादंबरी लेखनाकडे खेचून नेईल, अशी आशा आहे. (हा आनंद विश्वाची चिंता वाहणाऱ्या तुमच्या चेहऱ्यावर दिसणं कठीणच.)

कळावे.

***दिलीप माजगावकर***

## ‘राजहंस’ प्रकाशित अशोक डांगे यांची साहित्यसंपदा




परिशिष्ट



लंगडी आजी आणि
रावण मामा




पालट



टच आणि
इतर चित्रकथा

## ‘राजहंसी’ विविधा




भारताच्या सहा शेजारी देशांतील ठरावीक व्यक्तींना भारताचे नागरिकत्व ज्या कायद्याने मिळू शकते, त्या नव्या कायद्याच्या विविध पैलूंचा वेध घेणारे -

### नागरिकत्व दुरुस्ती कायदा
घटनात्मकता व वास्तवता

शेषराव मोरे

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

आज परिवर्तनाच्या चळवळी कुंठित झाल्याचे चित्र दिसते. अशाच शोधयात्रेत राजीव साने केवळ चिकित्सा करून थांबले नाहीत, तर स्वतंत्र नीतिशास्त्राच्या उभारणीची गरज त्यांनी ओळखली. भविष्यातील आवश्यक अशा विचारमंथनाच्या दिशेने जाणाऱ्यांना मार्गदर्शक ठरेल असे पुस्तक.




### स्फूर्तिवादी नीतिशास्त्र

राजीव साने

किंमत : ₹ २७०/- । (ट.ख. ₹ ५०)

‘नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण’ यंदापासून अमलात येतंय, अशा वेळी शिक्षणातल्या सगळ्या घटकांना पडणाऱ्या प्रश्नांची नेमकी उत्तरं देणारं, शिक्षणतज्ज्ञांनी लिहिलेलं मोलाचं पुस्तक.




### नवे शैक्षणिक धोरण
विद्यार्थी-पालकांसाठी मार्गदर्शन

प्रा. डॉ. नितीन करमळकर । मंगला गोडबोले

किंमत : ₹ २४०/- । (ट.ख. ₹ ५०)

## छतं गळोत : अनौपचारिक प्रकाशन



डावीकडून प्रमुख वक्त्या विनया बापट, श्रीधर देशपांडे, डॉ. सदानंद बोरसे, नेहा देशपांडे आणि मोनिका देशपांडे

श्रीधर देशपांडे लिखित 'छतं गळोत' ह्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन ५ एप्रिल २०२५ रोजी पुण्यातील सेनापती बापट रस्त्यावरील मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड ॲग्रिकल्चर यांच्या सुमंत मुळगावकर ऑडिटोरियममध्ये संपन्न झाले. प्रसिद्ध भाषा-अभ्यासक व अनुवादक विनया बापट ह्यांच्या हस्ते काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले. राजहंस प्रकाशनाच्या वतीने मुख्य संपादक डॉ. सदानंद बोरसे यांनी काव्यसंग्रहाविषयी आपले मनोगत व्यक्त केले व शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी श्रीधर देशपांडे यांनी आपला काव्यप्रवास उलगडून सांगितला.

## सोबत सांजवेळची : प्रकाशन सोहळा

डॉ. प्रियदर्शिनी कुलकर्णी लिखित व पद्मजा मेहेंदळे अनुवादित 'सोबत सांजवेळची' या पुस्तकाचे प्रकाशन दि.१९ एप्रिल रोजी पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन केंद्रातील प्रेक्षागृहात अभिनेत्री मृणाल देव - कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. राजहंस प्रकाशनाचे संपादक शिरीष सहस्रबुद्धे, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अरुण जामकर या वेळी उपस्थित होते.

डॉ. जामकर म्हणाले, ''दुर्धर आजाराला सामोरे जाताना हतबल रुग्ण आणि त्याच्या नातवाइकांना परिहार सेवा देणाऱ्यांचा मोठा आधार होतो. एकत्र कुटुंब



डावीकडून डॉ. प्रियदर्शिनी कुलकर्णी, मृणाल देव-कुलकर्णी,
डॉ. अरुण जामकर आणि डॉ. शिरीष सहस्रबुद्धे

व्यवस्था आणि फॅमिली डॉक्टर हे कधी काळी आपल्या समाजाचे बलस्थान होते. मात्र, काळाच्या ओघात या दोन्ही संकल्पना नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. रुग्ण आणि डॉक्टर यांच्यात स्पर्शासह विविध माध्यमांतून होणारा संवाद हरवत चालल्याने, तसेच त्यांच्यातील विश्वासाचा धागा कमकुवत होत चालल्याने अनेक समस्या निर्माण होत आहेत. सहानुभूती, सहवेदना आणि करुणा या त्रिसूत्रीच्या आधारे परिहार-सेवा देता येते.''

मृणाल कुलकर्णी म्हणाल्या, ''जवळच्या व्यक्तीचा आयुष्याच्या संध्याकाळी होणारा वेदनादायी मृत्यू आपल्याला हालवून टाकतो. वैद्यकीय 'स्पेशलायझेशन'मुळे एकाही डॉक्टरकडून रुग्णाच्या प्रकृतीविषयी योग्य माहिती मिळत नाही. अशा वेळी मनाने कितीही खंबीर असलो, तरी आता काय करायचे, अशी आपली अवस्था होऊन जाते. मृत्यू अटळ असला, तरी त्या मृत्यूला सामोरे जाण्याची प्रगल्भता परिहार-तज्ज्ञ आपल्यामध्ये निर्माण करतात.'' प्रियदर्शिनी कुलकर्णी यांनी मनोगतामध्ये लेखनप्रवास उलगडला.

## वस्त्रगाथा : प्रकाशन सोहळा

छत्रपती संभाजीनगर येथे दि. २१ एप्रिल रोजी साहित्य-संगीत-कला मंचतर्फे आयोजित शेक्सपिअर महोत्सवात विनय नारकर लिखित 'वस्त्रगाथा' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. या वेळी 'एक धागा सुखाचा' हा पुस्तकावर आधारित आगळावेगळा कार्यक्रम संपन्न झाला. संकेत कुलकर्णी यांनी खुमासदार शैलीत प्रश्न विचारत विनय नारकर यांना बोलते केले.

पुस्तकाची जन्मकथा सांगताना नारकर म्हणाले की, ''हजारो वर्षांपासून



डावीकडून शशिकांत पिंपळपुरे, संकेत कुलकर्णी, विनय नारकर व श्रीकांत उमरीकर

वस्त्रालंकारांनी मानवी मनाला भुरळ घातली आहे. वस्त्रकलेवर संशोधन करताना पडलेल्या प्रश्नांची उत्तरे देताना महत्त्वपूर्ण माहिती संकलित झाली. त्यातून वस्त्र संस्कृतीची ओळख देणाऱ्या 'वस्त्रगाथा'ची निर्मिती झाली. सोलापूर या मूळगावी वस्त्र विणण्याची मोठी परंपरा आहे; यातून अनेक विणकरांना भेटण्याचा योग आला. त्यांच्याकडून बरीच माहिती मिळाली. वकिली व्यवसायासोबतच विणकरांकडून वस्त्रे बनवून घेण्यासाठी डिझाईन बनवण्याचे काम सुरू केले. सोलापुरातील फिल्म फेस्टिव्हलमध्ये वेशभूषेसाठी ऑस्कर पुरस्कारविजेत्या भानुजी आल्या होत्या. त्यांच्यासाठी विणून घेतलेली शाल त्यांना फार आवडली. त्यांनी मोठी ऑर्डर दिली. त्यानंतर वकिली सोडून डिझायनिंगचा व्यवसाय सुरू झाला.''

संदर्भग्रंथ म्हणून 'वस्त्रगाथा' हा मौलिक ग्रंथ आहे, असे मत या वेळी जाणकारांनी व्यक्त केले.

---

## ज्याचं त्याचं एव्हरेस्ट : मुक्त संवाद

साहित्यप्रेमी भगिनी मंडळातर्फे दिनांक २१ एप्रिल रोजी मृणालिनी चितळे लिखित 'ज्याचं त्याचं एव्हरेस्ट' या बहुचर्चित कादंबरीवर कार्यक्रम आयोजित केला होता. रंजना वांबूरकर आणि डॉ. दाक्षायणी पंडित यांनी चितळे यांच्याशी संवाद साधला. उपलब्ध माहिती, स्वत:चे अनुभवविश्व आणि कल्पनाशक्ती यांच्या आधाराने लेखन कसे केले; हे सांगताना चितळे यांनी कादंबरीची निर्मितिप्रक्रिया उलगडून दाखवली. कादंबरीमध्ये ७०-७५ वर्षांचा कालखंड आणि भारत, दक्षिण आफ्रिका, अमेरिका, नेपाळ, जपान अशा विविध देशांत राहणाऱ्या व्यक्तिरेखा चित्रित केल्या आहेत. त्यामागचा आपला उद्देश हिमालयाची ओढ वैश्विक आणि कालातीत असते हे दाखवण्याचा आहे, असे त्यांनी नमूद केले. या ओढीपायी तीन



डावीकडून डॉ. दाक्षायणी पंडित, मृणालिनी चितळे आणि रंजना वांबुरकर

पिढ्यांमध्ये निर्माण झालेले ताणतणाव, संघर्ष, परस्परांना समजून घेण्याचे प्रयास या विषयावरची चर्चा विशेष रंगली आणि पुस्तकाबद्दल उत्सुकता निर्माण झाली. कार्यक्रमास मंडळाच्या विश्वस्त आणि अध्यक्ष मंदा खांडगे, नीलिमा गुंडी, अंजली कुलकर्णी यांच्यासह मोठ्या संख्येनं श्रोतृवर्ग उपस्थित होता.

## चंद्रकांत कुलकर्णी सादर करीत आहे... : अभिवाचन



'कुसुमाग्रज प्रतिष्ठान'चे विलास लोणारी, सुरेश भाटेवार, पाटील लोकेश शेवडे, चंद्रकांत कुलकर्णी, प्रतीक्षा लोणकर, अनिता दाते, प्राजक्त देशमुख, प्रकाश होळकर इ.

नाशिक येथील कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या वतीने कुसुमाग्रज स्मारक येथे २२एप्रिल रोजी प्रसिद्ध सिने, नाट्य दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी यांच्या 'चंद्रकांत कुलकर्णी सादर करीत आहे...' या पुस्तकाचे स्वागत करण्यात आले. 'मनोमंच ते रंगमंच' अशी अभिनव संकल्पना निवडून या पुस्तकावर अभिवाचनाचा कार्यक्रम या वेळी घेण्यात आला. अभिनेत्री प्रतीक्षा लोणकर, अनिता दाते आणि स्वत: चंद्रकांत कुलकर्णी यांनी अभिवाचन केले. पुस्तकाचे स्वागत प्राजक्त देशमुख यांनी केले; तर लोकेश शेवडे यांनी चंद्रकांत कुलकर्णी यांची प्रकट मुलाखत घेतली. या कार्यक्रमास रसिकांनी भरभरून दाद दिली.

❖

*वाचकांचा प्रतिसाद हाच लेखकाचा खरा पुरस्कार! हा प्रतिसाद मित्रांना कळवा, तसेच आम्हांलाही कळवा; म्हणजे तो आम्ही लेखकांपर्यंत पोहोचवू. प्रकाशक-लेखक-वाचक यांच्यात विचारांची देवघेव करण्यासाठी.*

### वीरप्पन विरुद्ध विजयकुमार

'वीरप्पन विरुद्ध विजयकुमार' या पुस्तकाचा डॉ. सदानंदजी बोरसे यांनी केलेला अनुवाद नुकताच वाचला आणि थरारून गेलो. चंदनाची चोरी आणि हस्तिदंताची तस्करी यात विशेष 'प्रावीण्य' मिळवलेल्या वीरप्पनने सुमारे २० वर्षे कर्नाटक, तामिळनाडू आणि केरळ या तीन राज्यांच्या पोलिसदलाला हैराण करून सोडले होते. पोलिसांनी रचलेल्या सापळ्यातून तो अनेकदा निसटला होता. त्याने त्याच्या 'करियर'मध्ये १२४ जणांची निर्घृण हत्या केल्याने त्याची अभूतपूर्व अशी दहशत या तीन राज्यांत पसरली होती. वीरप्पन इतका क्रूर होता की हत्या केलेल्या पोलीस अधिकाऱ्याचा शिरश्छेद करून त्याचे मुंडके लाथेने उडवण्यात त्याला विकृत मौज वाटत होती. अशा या क्रूरकर्म्याचा अत्यंत धाडसाने आणि चिकाटीने पाठलाग करून शेवटी त्याला ठार करणारा आयपीएस अधिकारी होता के. विजयकुमार. पुस्तकाच्या मलपृष्ठावर वीरप्पनच्या कहाणीचे 'कल्पनेहूनही भयंकर आणि रहस्यपटाहून थरारक असं खिळवून ठेवणारं वास्तव' असे वर्णन केले आहे. ते तंतोतंत खरे आहे याची साक्ष आपल्याला हे पुस्तक वाचल्यावर पटतेच पटते. मुळात विजयकुमार यांनी शब्दबद्ध केलेली ही कहाणी डॉ. बोरसे यांनी अतिशय ओघवत्या शब्दांत मराठीत आणली आहे.

वीरप्पनचा खात्मा झाला याचे पूर्ण श्रेय विजयकुमार यांचे नाही, कारण या प्रकरणाची सूत्रे त्यांच्या हाती येण्याआधी अनेक अधिकाऱ्यांनी त्याच्याशी कडवी झुंज दिली होती. त्यांच्यापैकी काही जणांनी हौतात्म्यदेखील पत्करले होते. खुद्द विजयकुमार यांनीही ही गोष्ट मोकळेपणाने मान्य केलीच आहे. त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवण्यात आली तेव्हा त्यांनी या प्रकरणाचा सांगोपांग अभ्यास केला. जुन्या सगळ्या फाईल्स तपासल्या. या सगळ्या अभ्यासाचे तपशील विजयकुमार यांनी दिले आहेत. ते कालक्रमानुसार आणि रंजक पद्धतीने दिलेले आहेत. त्यामुळे

वीरप्पन प्रकरणाचा सगळा इतिहास आपल्या डोळ्यांसमोर उभा राहतो. त्याचे क्रौर्य, त्याने केलेली अपहरणे, त्याचा धूर्तपणा, त्याच्यात असलेली असामान्य ऊर्जा अशी त्याची अनेक वैशिष्ट्ये उलगडत जातात.

या प्रदीर्घ मोहिमेमध्ये पोलीस अधिकाऱ्यांनी दाखवलेले शौर्य पाहून आपण अक्षरश: नतमस्तक होतो. वीरप्पनला पकडण्यासाठी जे विशेष कृतिदल उभारण्यात आले होते, त्यात आपला समावेश व्हावा यासाठी अत्यंत आग्रही असलेले पोलीस अधिकारी पाहून आपण थक्क होतो. त्यांना मानाचा मुजरा करावासा वाटतो. स्वतंत्र भारताच्या इतिहासातील कदाचित सर्वांत क्रूर ठरलेल्या एका बलाढ्य डाकूच्या विरोधात उभे राहण्याची त्यांची ही हिंमत आपल्याला फार आश्वासक वाटते.

या पुस्तकात दिलेला एक किस्सा रंजक पण तितकाच अंतर्मुख करायला लावणारा आहे. वीरप्पनला पकडता येईल अशी माहिती देणाऱ्यास काही लाख रुपयांचे बक्षीस सरकारने जाहीर केले होते. एक पोलीस अधिकारी एका खेड्यात जाऊन याबाबतची माहिती देतो. एक मनुष्य विचारतो - या बक्षिसाच्या रकमेत किती शेळ्या येतील? तो अधिकारी हिशेब करून सांगतो - साधारण १६ हजार. यावर त्या माणसाचे उत्तर असते - काय करायचं आहे इतक्या शेळ्या घेऊन?

पुस्तकात दिलेले अनेक फोटो आणि नकाशे खूप उपयुक्त ठरतात. तामिळनाडूच्या माजी मुख्यमंत्री जे. जयललिता यांचे एक वेगळेच रूप या पुस्तकात पहायला मिळते. ते म्हणजे वीरप्पनच्या विरोधात खंबीरपणे उभी राहिलेली एक पोलादी स्त्री. राजहंस प्रकाशनाच्या पुस्तकांच्या मांडणीबद्दल नव्याने काय लिहायचे? पुस्तकाची निर्मिती अतिशय देखणी आहे. जंगलाच्या वातावरणाची निर्मिती करण्यासाठी वापरलेला हिरवा रंग योग्य तो परिणाम सहजतेने साधतो. वीरप्पनच्या भल्यामोठ्या मिश्यांचे जवळून घेतलेले फोटो त्याच्या दहशतीची चुणूक दाखवतात.




चंदनचोरी अन् हस्तिदंताची तस्करी. १२४ पाशवी हत्या. अनेक धाडसी अपहरणं. तीन राज्यांच्या पोलिसांना वीस वर्षं दिलेली झुकांडी. अशी भीषण कृत्यं करणाऱ्या क्रूरकर्म्याला यमसदनाला धाडणाऱ्या के. विजय कुमार या आयपीएस अधिकाऱ्यानं सांगितलेली सत्यकथा.

**वीरप्पन विरुद्ध विजय कुमार**

के. विजय कुमार । अनुवाद : डॉ. सदानंद बोरसे

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३८०/- । (ट.ख. ₹ ५०)

पण या पुस्तकाचे खरे सामर्थ्य आहे त्याच्या अनुवादात. हा अनुवाद, अनुवाद वाटतच नाही. डॉ. सदानंदजी बोरसे यांना आपण एक सव्यसाची संपादक, लेखक आणि निष्णात डॉक्टर म्हणून ओळखतो. पण यापुढे त्या ओळखीत एक महत्त्वाची भर पडली आहे - ते एक समर्थ अनुवादकार आहेत.

हे पुस्तक वाचून पूर्ण करताना एकच खंत माझ्या मनात निर्माण झाली - हे इतके सुंदर पुस्तक मी इतक्या उशिराने का वाचले?

**_डॉ. गिरीश पिंपळे_**
नाशिक

---

## चित्रलेखा

Dear Hemant.... Hi...I am Shivaji Bachhav. Nishikant Ahire is my nephew. He has sent me a copy of your book. And requested also to give comments, this being your first book.

Difficult to believe that this is your first attempt. Well done. Myself didn't know the story Chitralekha. It's no wonder that the story n philosophical arguments in it fascinated you. You presented it in marathi as good as your original work.

Language tone appropriate. Dialogues तर जुगलबंदीच. कथा ठरावीक त्याग वगैरेवर येऊन पोहोचली असे वाटते. पण उपसंहार तिला वेगळ्याच उंचीवर नेतो. दोष शोधावे लागतील इतपत कमी व किरकोळ. आता उदाहरण म्हणून... शेवटाला येताना.. पृष्ठ ११४वरच्या चित्राखाली जो संवाद दिला आहे... तो रस्त्यावर

श्रेष्ठ हिंदी साहित्यिक भगवतीचरण शर्मा यांच्या
साहित्यात अन् रुपेरी पडद्यावर गाजलेल्या
अभिजात कादंबरीचा प्रवाही मराठी अनुवाद

चित्रलेखा

भगवतीचरण शर्मा
अनुवाद : हेमंत गोडसे

किंमत : ₹ १८०/- । (ट.ख. ₹ ५०)



अंधारात घडतो. चित्र वेगळेच दाखवते. उपसंहार एक समर्पक तात्त्विक चिंतन आहे. हे खरेच की सत्य, अहिंसा आदी मूलतत्त्वे सापेक्ष आहेत. मनापासून अभिनंदन. तुमचे पहिले अपत्य तुमच्याकडून मोठ्या अपेक्षा ठेवायला लावणारे.

***शिवाजी बच्छाव***
नाशिक

---

## वसुंधरेचे शोधयात्री

मुखपृष्ठावरील शिडाच्या बोटीचा गडद रंग सोडता जे रंग आपल्याला दिसतात, ते डोळ्याला सुखावतात आणि शांत करतात. त्यासोबतच बोटीचे ठळक महत्त्वही पटवतात. फिकट निळा आणि फिकट हिरवा यांतल्या बांधावर बोट दिसणे म्हणजे या पुस्तकात लेखाला काय सांगायचे असेल, याचा साधारण अंदाज येतो आणि पुस्तक संपले की तो अंदाज खरा ठरल्याची जाणीवही होते.

डॉ. अनुराग लव्हेकर यांच्याशी एका समूहाच्या माध्यमातून ओळख होती. दिल्ली येथे झालेल्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात साक्षात त्यांच्याकडूनच संदेश आणि स्वाक्षरीसह हे पुस्तक मला भेट मिळाले.

पुस्तक वाचायला सुरुवात केली आणि प्रस्तावनेतच लक्षात आले की, किती अभ्यासू व्यक्ती आपल्या स्नेही आहेत. अनेक संदर्भ, कालपट, संज्ञा आणि स्थळ यांची सखोल माहिती आपणास या पुस्तकात मिळते. येथे आपल्याला पृथ्वीतलावरील अनेक शोधनायक भेटतात. अज्ञात गोष्टीचे जसे कुतूहल वाढत जाते, तसे हा ग्रंथ वाचताना होते. काही गोष्टी नक्कीच आपल्याला माहीत आहेत पण इतक्या


'भूगोलाच्या रंगमंचावर इतिहासाचे नाट्य सादर होत असते.'
या विधानाची प्रचिती देणाऱ्या -
आपल्या शोधयात्रांमधून नवा इतिहास घडवणाऱ्या
शोधनायकांची गाथा.

वसुंधरेचे शोधयात्री

डॉ. अनुराग लव्हेकर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ५५०/- । (ट.ख. ₹ ५०)

तपशीलवार आपल्याला त्या ज्ञात होत जातात की, आता पुढे काय असेल हा विचार थांबतच नाही. एखाद्या खंडाचे नाव कसे पडले असेल, याचेही अनेक नमुने यात मिळतील. जे शोधनायक लेखकाने मांडले आहेत त्या प्रत्येकाकडून आपणास काही ना काही शिकायला मिळते. त्यांच्या अथक प्रयत्न आणि जिद्दीमुळे ज्ञानाची नानाविध क्षितिजे उदयास आली हे ही लक्षात येते. कधी सहकार्य करीत तर कधी संघर्ष करीत निर्मिती, व्यवसाय, वितरण, व्यापार, प्रवास, अर्थकारण, उद्योग, धर्मकारण, राजकारण, इतिहास, भूगोल अशा अनेक मानवी आयामांवर या शोधयात्रींचा अमीट ठसा जाणवतो. सोबतच एकमेकांच्या जीवनमूल्यांची देवाणघेवाणही दिसून येते.

हल्ली मेसेज वेळेत पोहोचला नाही, तर क्षणात अस्वस्थ होणारे आपण आणि एक टेलिग्राम करण्यासाठी ८०० कि.मी. प्रवास करणारा एक शोधनायक! किती अनंत उपकार आहेत या सगळ्यांचे आपल्यावर! कैक गोष्टी सहज त्यांनी आपल्या हातात आणून दिल्यात. स्वतःच्या अदम्य जिद्दीपायी स्वतःची आयुष्ये पणाला लावलीत.

'असे जगावे छाताडावर आव्हानांचे लावून अत्तर, नजर रोखुनी नजरेमध्ये आयुष्याला द्यावे उत्तर', हे गुरु ठाकूरचे शब्द लेखकासोबत आपणासही प्रकर्षाने जाणवतात. प्रत्येकाने हे पुस्तक वाचायलाच हवे आणि या ज्ञानसागरात अथांग बुडून जाण्याचा स्वानुभव घ्यायला हवा.

**_नीलाक्षी काळे_**
पुणे

**मुखपृष्ठ, मुखपृष्ठाच्या व मलपृष्ठाच्या आतील पानांवरील पुस्तकांविषयी**

- माणिकमोती — किंमत : ₹ ४००/-
  शोभा बोंद्रे
- एक उलट एक सुलट - भाग २ — किंमत : ₹ २६०/-
  अमृता सुभाष
- संघातील मानवी व्यवस्थापन — किंमत : ₹ २५०/-
  नितीन गडकरी
- वास्तविकतेचे रंग — किंमत : ₹ ४००/-
  दिलीप फडके

कधी न गळणारा

## ‘राजहंसी’ मोहोर

राजहंस प्रकाशनचे अव्वल लेखक,
त्यांची गाजणारी पुस्तकं आणि रसिक वाचक यांची थेट गाठ दर बुधवारी घालून देणारा

**श्रवणीय साप्ताहिक उपक्रम (ऑडिओ पॉडकास्ट)**

**१ मे २०२४पासून सुरू...**

आमच्या नवनवीन योजनांसाठी बघत राहा

**‘राजहंस ॲप’**

App Store
आयफोन आणि आयपॅडसाठी

Google Play
अँड्रॉइड फोन आणि टॅबलेटसाठी

तुम्ही ‘राजहंस’ला असेही भेटू शकता

Website : www.rajhansprakashan.com

## राजहंस प्रकाशन

- १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. ✆ २४४६५०६३/२४४७३४५९.
  E-mail : rajhansprakashan1@gmail.com | Website : www.rajhansprakashan.com
- राजहंस पुस्तक पेठ, साई सरस्वती, शिक्षकनगर, गल्ली क्र. ७च्या सुरुवातीस, परमहंसनगर, वनाजजवळ, पौड रोड, पुणे ४११०३८. ✆ ९३२२६३०७०३.
- शॉप नं. २, सखारामकृपा अपार्टमेंट, अमर हिंद मंडळासमोर, गोखले रोड, दादर (प.), मुंबई ४०००२८. ✆ २४२२३९०१.
- नरेश सबजीवाले, गुलमोहर हॉलसमोर, खामला रोड, नागपूर ४४००२५. ✆ ९३७२२२५२०१.
- राजहंस ग्रंथघर, अद्रुप देशपांडे, १०, शून्य संकुल, सहजीवन कॉलनी, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर ४३१००१. ✆ ९०९६९४३३६९.
- पंकज क्षेमकल्याणी, २, तळमजला, गुरुपुष्य अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्रामागे, आनंद नगर, (सावरकर नगर), गंगापूर रोड, नाशिक - ४२२०१३. ✆ ९४२२२५२२०८
- अक्षरदालन, निर्मलाय प्लाझा, कोळेकर तिकटी, कोल्हापूर ४१६०१२. ✆ २६४६४२४.
- डॉ. उमेश करंबेळकर, ३२५ मंगळवार पेठ, रघुकुल अपार्टमेंट, सातारा ४१५००२. ✆ २८२५१०.
- मुग्धा शेवाळकर, तळमजला, साईदत्त अपार्टमेंट, सितारा बजाज शोरूमजवळ, शांतीनगर, फोंडा, गोवा ४०३४०१. ✆ ७३९७४६१३९० / ८६०५८९१०१९
- नंदादीप सर्व्हिसेस, २३६/१ साखर पेठ, प्लॉट नं १, नारायण कॉम्प्लेक्स, विणकर बागेसमोर, सोलापूर - ४१३००५ ✆ ९८२२८०७७१५.

सामान्य माणसातल्या असामान्य क्षमता फुलवून
मोठाली कामे करणारी संघटना म्हणजे 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ'.
शिक्षण, संस्कार, कामगार, विद्यार्थी, उद्योग, आरोग्य, राजनिती
अशा विविध क्षेत्रांत 'संघपरिवार' एकवटलाय.
संघाच्या यशस्वितेचं गमक सामावलंय त्यांच्या मानवी व्यवस्थापनात....
जाणून घेऊया हे व्यवस्थापन एक स्वयंसेवकांच्या नजरेतून....



Registered RNI NO. MAHMAR / 2009 / 33647)
(Published on 15th of every month and posted on 20th of every month at S.P.COLLEGE PO, Pune)
Periodical post

ही कहाणी आहे आजच्या काळाची, वर्तमानातील व्यक्ती अन् जनमानसाची ! हा आहे एक लढा.... शिक्षणातून आलेल्या आत्मविश्वासाने जातिभेदांशी, पूर्वग्रहांशी दिलेला! धाडसी मुलीच्या रूपातून आजच्या समस्यांची गुंतागुंत उलगडत व्यामिश्र वर्तमानाचा वेध घेणारी ही कादंबरी वाचायलाच हवी....

वास्तविकतेचे रंग

दिलीप फडके




प्रेषक : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन,** १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. फोन - २४४७३४५९

**सदरचे मासिक 'राजहंस' प्रकाशनाच्या वतीने मुद्रक, प्रकाशक रेखा दिलीप माजगावकर यांनी रिच प्रिंट्स, २७२ नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : डॉ. सदानंद बोरसे**